दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ३ रे अंक १४५ वा मंगळवार दि.३१ ऑक्टोंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.







## राज्यांना वीजनिर्मितीवर कर आकारणीचा अधिकार नाही



नवी दिल्ली : कोणत्याही राज्य सरकारला कोळसा, पाणी, वायू आणि सूर्यप्रकाशापासून तयार केलेल्या विजेवर कर किंवा शुल्क आकारण्याचा अधिकार नाही, असे केंद्र सरकारने स्पष्ट केले. यावर राज्यांनी लावलेले कर बेकायदा आणि घटनाबा असल्याचे केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाने २५ ऑक्टोबर रोजी अधिसूचनेद्वारे स्पष्ट केले. अशा कोणत्याही प्रकारे अतिरिक्त कर किंवा शुल्क आकारले जात असेल तर ते तत्काळ परत करावे असे मंत्रालयाने स्पष्ट केले आहे.

कोणत्याही स्रोताद्वारे निर्माण केलेल्या विजेवर तसेच आंतरराज्य विजेच्या पुरवठ्यावर राज्यांनी कोणताही अतिरिक्त कर किंवा शुल्क आकारू नये, असे स्पष्ट केले आहे. राज्य सूचीतील ५३ व्या नोंदीनुसार राज्यांना अधिकार क्षेत्रातील विजेचा वापर, विक्रीवर कर आकारण्याचा अधिकार दिले आहेत. विजेच्या निर्मितीवर कर आकारण्याचा अधिकार यात दिलेला नाही. एका राज्यात निर्माण होणा-या विजेचा वापर दुस-या कोणत्यातरी राज्यात होतो. त्यामुळे कोणत्याही कोणत्याही राज्याला इतर राज्यांच्या नागरिकांवर कर आकारता येणार नाही. २८६ या अनुच्छेदानुसार वस्तू व सेवांचा पुरवठा राज्याबाहेर होत असेल तर त्यावर राज्याला कर आकारता येणार नाही. २८७ व २८८ या अनुच्छेदानुसार केंद्र सरकार किंवा यंत्रणेला दिल्या जाणा-या विजेवर तसेच केंद्र सरकारला विकल्या जाणा-या विजेवरही कर आकारता येत नाही.

काय आहेत तक्रारी?

– मंत्रालयाने म्हटले आहे की, अनेक राज्यांनी या स्रोतांद्वारे तयार केलेल्या विजेवर विकासकर वा विकासनिधी या नावाखाली अतिरिक्त शुल्क आकारल्याच्या अनेक तक्रारी आहेत.

– वीजनिर्मितीवर राज्यांकडून केलेली कर आकारणी वा लावलेले अतिरिक्त शुल्क बेकायदा व घटनाबा आहे. कर किंवा शुल्क आकारणी अधिकाराची माहिती सातव्या अनुसूचित दिलेली आहे.

– अनुसूचीतील ४५ आणि ६३ व्या नोंदीनुसार राज्यांना कर वा शुल्क आकारणीचे अधिकार आहेत. परंतु कोणत्याही विशेष कराचा इथे उल्लेख नाही. त्यामुळे राज्य सरकारांना कोणत्याही गोष्टीआड लपता येणार नाही. हा अधिकार केवळ केंद्र सरकारकडे आहे.

## बीडमध्ये बेमुदत संचारबंदी

बीड/जालना : प्रतिनिधी

मराठा आरक्षणाच्या मुद्यावरून बीडमध्ये अक्षरश: वणवा पेटला आहे. आक्रमक आंदोलकांनी थेट बीड जिल्ह्यातील माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके यांच्या घरावर हल्लाबोल केला. एवढेच नव्हे, तर त्यांच्या बंगल्याच्या आवारात उभ्या असलेल्या गाड्याही जाळल्या. तसेच माजलगाव नगर परिषद, सोळंके यांच्या संस्थांमध्येही धुडगूस घालत आग लावली. याची धग कमी होत नाही, तोच बीडचे आमदार संदीप क्षीरसागर, जयदत्त क्षीरसागर यांचे घरही पेटवून दिले. तसेच राष्ट्रवादी भवन, केएसके कॉलेज, हॉटेललाही आग लावली. आंदोलक हिंसक बनल्याने चिंता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, जिल्ह्यात ठिकठिकाणी जाळपोळ झाल्याने बीड जिल्हा आणि सर्व तालुका मुख्यालयापासून पाच किलोमीटर हद्दीपर्यंत आणि सर्व महामार्गावर पुढील आदेश येईपर्यंत संचारबंदी लागू करण्यात आली.

मराठा आरक्षणासाठी उपोषण करणारे मनोज जरांगे पाटील यांच्याबद्दल आमदार प्रकाश सोळंके यांनी जे वक्तव्य केले, त्यामुळे मराठा आंदोलक आक्रमक झाले आणि त्यांनी थेट त्यांच्या घरावर हल्ला केला. एवढेच नव्हे, तर त्यांच्या घराच्या आवारातील गाड्याही पेटवून दिल्या. त्यामुळे घर परिसरात धुराचे लोळ पसरले होते. एका आंदोलकाने आ. सोळंके यांना फोन केला, त्यावेळी जरांगे पाटील यांनी दिलेली ४० दिवसांची मुदत संपल्याची आठवण करून दिली. त्यावेळी आ. सोळंके यांनी कोण म्हणतंय, सरकार आरक्षण देत नाही. ४० दिवस झाले म्हणून काय झाले, हे आरक्षण देऊन परत कोर्टात अडकवून ठेवायचे का, आरक्षणाबाबत अशी आडमुठी भूमिका घेऊन चालत नाही, असे म्हटले. तसेच शासनाने समिती नेमली आहे. त्या समितीचा अहवाल घेऊन शासन आरक्षण देणार आहे, असेही ते म्हणाले. त्यांच्या या वक्तव्याची ऑडिओ क्लिप व्हायरल झाली. त्यानंतर संतप्त आंदोलकांनी थेट त्यांच्या घरावर दगडफेक केली.

## ८१.५ कोटी भारतीयांचा कोविड-१९ चाचणी डेटा लीक?

नवी दिल्ली : भारतातील तब्बल ८१.५ कोटी भारतीय नागरिकांचा वैयक्तिक तपशील चोरीस गेला आहे. यामध्ये कोविड -१९ चाचणी डेटा, आधारकार्ड आणि पासपोर्ट आदी माहितीचा समावेश आहे. देशातील आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या डेटा लीक प्रकरणामध्ये या प्रकरणाचा समावेश आहे. हा डेटा इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्चच्या कोविड-१९ चाचणी नोंदींमधून काढण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. घटनेचे गंभीर स्वरूप पाहता, आयसीएमआरने तक्रार दाखल केल्यानंतर केंद्रीय अन्वेषण ब्युरो या प्रकरणाची चौकशी करेल.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सीईआरटी-इनने आयसीएमआरला उल्लंघन आणि नमुना डेटाच्या पडताळणीबद्दल माहिती दिली आहे. ती आयसीएमआरच्या वास्तविक डेटाशी जुळते. डेटा लिक झाल्यानंतर सरकारने विविध एजन्सी आणि मंत्रालयांच्या उच्च अधिका-यांवर ताशेरे ओढले आहेत. लीकमध्ये परदेशी कलाकारांचा सहभाग आहे. आयसीएमआरने तक्रार दाखल केल्यानंतर गांभीर्य पाहता सीबीआय या प्रकरणाची चौकशी करेल.भारताच्या आरोग्य यंत्रणेला हॅकर्सने लक्ष्य करण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वीही ब-याचवेळा हॅक करण्यात आले आहे. गेल्या वर्षी, एम्सला सायबर हल्ल्याचा सामना करावा लागला होता. त्यावेळी विविध आरोग्य प्रणालींमध्ये बदल घडवून आणले होते. या सायबर हल्ल्यामध्ये भारताच्या शेजारील देशांपैकी एका देशाशी संबंध होता. गेल्या वर्षी, आयसीएमआर सर्व्हर हॅक करण्यासाठी ६,००० हून अधिक प्रयत्न केले गेले आहेत.

## लोकाभिमुख व गतिमान प्रशासनावर मनपाचा भर पालिका आयुक्तांची माहिती

## अतिक्रमण हटविण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम अनधिकृत बांधकामांचे सर्वेक्षण करणार



लातूर/प्रतिनिधी: महानगरपालिकेचे प्रशासन अधिकाधिक लोकाभिमुख व गतिमान असावे असा आपला प्रयत्न आहे.शहरातील नागरिकांना दर्जेदार सेवा- सुविधा देण्यासाठी पालिका प्रशासन कटिबद्ध आहे.शहरातील अतिक्रमणे काढण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम हाती घेण्यात येणार असून अनधिकृत बांधकामांचे सर्वेक्षण केले जाणार असल्याची माहिती मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी दिली. पालिका मुख्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत आयुक्त मनोहरे बोलत होते.यावेळी अतिरीक्त आयुक्त शिवाजी गवळी,उपायुक्त मयुरा शिंदेकर, सहाय्यक आयुक्त मंजुषा गुरमे, मुख्य लेखाधिकारी रावसाहेब कोलघणे,सहाय्यक संचालक नगररचना निकिता भांगे आदींसह अधिकाऱ्यांची उपस्थिती होती. आयुक्तांनी यावेळी आपल्या वर्षभराच्या कामकाजाचा आढावा सादर केला.यावेळी माहिती देताना आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी सांगितले की,शहरातील अतिक्रमणे आणि अनधिकृत बांधकामांचे सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले आहेत. आगामी एक ते दीड महिन्यात हे सर्वेक्षण पूर्ण होईल. त्यानंतर पोलीस संरक्षणात अतिक्रमण हटाव मोहीम हाती घेतली जाणार आहे. अतिक्रमण काढल्यानंतर त्या जागेवर पुन्हा अतिक्रमण होऊ नये यासाठी उपाययोजना केल्या जाणार आहेत. अनधिकृत बांधकामाबाबतही लवकरच मोहीम हाती घेण्यात येणार आहे. बांधकामात अनियमितता आढळली तर संबंधित नागरिक तसेच पालिकेच्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करणार असल्याचे आयुक्तांनी सांगितले. लातूर शहराला सप्टेंबर २०२४ पर्यंत पुरेल एवढा पाणीसाठा सध्या मांजरा प्रकल्पात आहे.तरीही नागरिकांनी पाण्याचा वापर काटकसरीने करावा,असे आवाहन आयुक्तांनी केले. व्यावसायिक व सार्वजनिक वापराच्या इमारतींना आग लागून दुर्घटना होऊ शकते.त्यासाठी अशा इमारतींना अग्नीरोधक यंत्रणा बंधनकारक आहे. पालिकेकडून दरवर्षी अशा इमारतींचे फायर ऑडिट केले जाणार असल्याचे आयुक्त म्हणाले. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांचा जीव वाचविण्यासाठी मनपा २५ मीटरचे रेस्क्यू लँडर खरेदी करणार असल्याचेही ते म्हणाले. अनेकदा घरगुती वापराचे सिलेंडर व्यावसायिक ठिकाणी वापरले जाते. त्यामुळे धोका होऊ शकतो.या संदर्भात मा.जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करून पुढील धोरण ठरविण्यात येईल. कचरा व्यवस्थापन आणि शहराच्या स्वच्छतेकडे प्राधान्याने लक्ष दिले जात आहे.शहर अधिक सुंदर करण्यासाठी पालिका प्रयत्नशील आहे. स्वच्छतेसाठी नुकतीच जटायू मशीनची खरेदी करण्यात आली असून आता स्वच्छता गतिमान होणार आहे.प्रदूषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी मनपाकडून उपाययोजना केल्या जात आहेत.मनपा मुख्यालयसह मनपाच्या सर्व इमारतींचे जल पुनर्भरण करण्यात आले आहे. नागरिकांनीही पुनर्भरण करावे यासाठी जनजागृती केली जात आहे. पालिकेच्या वतीने सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात आला असून यामुळे आर्थिक बचत होत आहे.कचरा आणि टाकाऊ वस्तु पासून बायोगॅस निर्मितीचे प्रकल्प मनपाने उभारले असून त्यापैकी काही कार्यान्वित झाले आहेत.पालिकेच्या कामाचा व्याप मोठा असून कर्मचारी अपुरे आहेत.शासनाने कांही पदे भरण्यास मंजुरी दिली असून त्याची कार्यवाही लवकरच सुरू केली जाणार असल्याचे आयुक्त म्हणाले. भुयारी गटार योजनेचा प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला असून तो मंजुरीच्या टप्प्यात आहे. मनपाच्या चारही झोनमध्ये प्रत्येकी दोन वाचन कट्ट्यांची निर्मिती केली असून स्पर्धा परीक्षा अभ्यासिका केंद्रही सुरू केले आहेत.ग्रंथालय इमारतीवर सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत.नागरिकांच्या आरोग्यासाठी आपला दवाखाना हा उपक्रम चालू करण्यात आला असून शहरातील वनराईचे प्रमाण वाढविण्यासाठी 'वन बर्थ वन ट्री' हा अनोखा उपक्रम राबवला जात आहे. मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त ज्येष्ठ नागरिकांसाठी पालिकेने मोफत मोतीबिंदू नेत्र शस्त्रक्रिया शिबिरही आयोजित केले होते. गरोदर मातांसाठी जननी रथ योजना पालिका राबवत आहे.आधार नसलेल्या व्यक्तींसाठी नागरी बेघर निवारा उभारण्याचे काम सुरू आहे.बचत गटांच्या माध्यमातून पालिकेने महिलांचे संघटन केले असून त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी आर्थिक पाठबळ दिले आहे. शहरात प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ४८०८ घरकुले मंजूर असून त्यापैकी २७२१ घरकुलांची कामे पूर्ण झाली आहेत.रमाई आवास अंतर्गत चालू वर्षात १०१३ घरकुले मंजूर केली आहेत. ज्येष्ठ नागरिकांसाठी शहरात विरंगुळा केंद्र सुरू करण्यात आली असून महिलांसाठी शहर बस सेवा मोफत उपलब्ध आहे. आणखी ५० बसेसचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला असल्याचे आयुक्त म्हणाले.

## धिरज देशमुख यांच्याकडून मुख्यमंत्र्यांना पत्र, राज्यपालांची भेट



लातूर : मराठा समाजाला तातडीने आरक्षण द्या, अशी मागणी 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्याकडे पत्राद्वारे केली. तसेच, या मागणीसाठी राज्यपाल श्री. रमेश बैस यांचीही त्यांनी भेट घेतली.यासंदर्भात बोलताना आमदार श्री. धिरज देशमुख म्हणाले, मराठा समाजास आरक्षण मिळावे या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील हे २५ ऑक्टोबरपासून उपोषण करीत आहेत. त्यांची प्रकृती दिवसेंदिवस ढासळत आहे. तर दुसरीकडे मराठा समाजातील तरुणांच्या आत्महत्येच्या घटना दररोज घडत आहेत. त्यामुळे महाराष्ट्र कमालीचा अस्वस्थ झाला आहे. मात्र, सरकार वेळकाढूपणा करीत आहे. सरकारने मराठा बांधवांच्या सहनशीलतेचा अधिक अंत न पाहता विधिमंडळाचे विशेष अधिवेशन बोलावून आरक्षणाबाबत ठोस निर्णय घ्यावा. कुठलीही कायदेशीर त्रुटी न ठेवता आरक्षण जाहीर करावे, अशी मागणी केली आहे. ती पूर्ण होईपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही, असेही आमदार श्री. धिरज देशमुख यांनी सांगितले.काँग्रेसच्या आमदारांचे मुंबईत आंदोलन : मराठा समाजाला त्वरित आरक्षण मिळाले पाहिजे, या मागणीसाठी काँग्रेसच्या आमदारांनी एकत्र येवून आज विधानभवनाच्या पायऱ्यांवर आंदोलन केले. त्यानंतर राज्यपाल श्री. रमेश बैस यांची काँग्रेस पक्षाच्या व महाविकास आघाडीच्या आमदारांनी राजभवन येथे भेट घेतली. यावेळी आमदार श्री. धिरज देशमुख उपस्थित होते. मराठा समाजास आरक्षण मिळण्याच्या दृष्टीने तातडीने कार्यवाही व्हावी. तसेच, महाराष्ट्रात निर्माण झालेल्या स्थिती प्रकरणी आपण हस्तक्षेप करावा, अशी विनंती राज्यपालांना याप्रसंगी करण्यात आली.

## पिक विमा कंपनीने लातूर जिल्ह्यातील शेतकर्यांना २५ टक्के अग्रिम द्यावे - माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर



लातूर दि.३०-१०-२०२३ पावसाच्या खंडामुळे शेतकर्यांच्या खरीप हंगामातील पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. त्यामुळे पिक विमा कंपनीने शेतकर्यांना २५ टक्के अग्रिम द्यावे. अशा मागणीचे निवेदन भाजपा नेते तथा किसान मोचा गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी जिल्हाधिकार्यांना दिलेले आहे. यावेळी जननायक संघटनेचे तालुका कार्याध्यक्ष राजाभाऊ मुळे, माधवराव गायकवाड आदी उपस्थित होते. लातूर जिल्ह्यातील ६० महसूल मंडळामध्ये २१ दिवसापेक्षा अधिक पावसाचा खंड पडलेला आहे. त्यामुळे खरीपाचे ५० टक्के पेक्षा अधिक नुकसान झालेले आहे. त्यामुळे शेतकर्यांना सरसकट २५ टक्के अग्रिम नुकसान भरपाई एक महिण्याच्या आत शेतकर्यांच्या खात्यावर जमा केली पाहिजे असा नियम असताना कंपनीने अद्यापपर्यंत कुठलीही कार्यवाही केलेली नाही. जिल्हास्तरीय समितीने कृषी विभाग व विमा कंपनीच्या प्रतिनिधीने केलेल्या सर्वेक्षण रिपोर्टवरून १० ते ११ मंडळातच २५ टक्के अग्रिम नुकसान भरपाई देण्याबाबत कळविल्याचे समोर आलेले आहे. त्यामुळे इतर मंडळातील शेतकर्यांवरती अन्याय होत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.ना.एकनाथराव शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मुंबई भेटून शेतकर्यांना अग्रिम अनुदान देण्याची मागणी करणार असल्याचे माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर साहेबांनी जिल्हाधिकारी घुगे-ठाकूर यांना सांगितले. तसेच जिल्हाधिकारी सौ.वर्षाताई ठाकूर यांनी शेतकर्यांना मदत करण्यासाठी वास्तव भूमिका घेऊन सक्रीय काम केल्यामुळे त्याना धन्यवाद दिले. जिल्हा रूग्णालयाचा प्रश्न त्वरीत सोडवावा लातूर जिल्हा रूग्णालय स्थानिक आमदाराच्या अकार्यक्षमतेमुळे गेल्या आठ ते दहा वर्षापासून जागेअभावी बांधकाम झाले नाही व निधीमुळे लातूरचे कृषी महाविद्यालय परिसरात होणारे रूग्णालय रखडलेले आहे. त्यामुळे याबाबतही योग्य तो निर्णय घेऊन जिल्हा रूग्णालयाचा प्रश्न त्वरीत मार्गी लावावा या संदर्भात आपण मा.मुख्यमंत्री साहेब व आरोग्य मंत्री यांना हा प्रश्न सोडविण्याची मागणी करणार असल्याचे माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकरांनी यावेळी बोलताना केली.

## संपादकीय....

# काँग्रेसाध्यक्षांची वर्षपूर्ती..

योग्य समन्वय, संवाद आणि अनुभवाच्या बळावर त्यांनी कर्नाटकात भाजपचा पराभव करून गोंधळलेल्या काँग्रेसला सूर मिळवून दिला. चेतन शिंदे काँग्रेसचे नवे अध्यक्ष रबरस्टॅम्पप्रमाणे काम करतील हा विरोधकांचा आणि पत्रकारांचा दावा यांनी खोटा ठरवला आहे. त्यांच्या सर्वसमावेशक नेतृत्वाखाली गेल्या वर्षभरात काँग्रेसला नवा सूर सापडू लागला आहे. नरेंद्र मोदींच्या वादळात दिशा भरकटलेल्या काँग्रेसने गेल्या वर्षी २६ ऑक्टोबर २०२२ रोजी दक्षिण भारतातील दलित समाजातून आलेल्या, ५० वर्षांच्या प्रदीर्घ राजकीय, सामाजिक, प्रशासकीय कामकाजाचा अनुभव असणाऱ्या स्वच्छ प्रतिमेच्या मल्लिकार्जुन खरगे यांना गांधी कुटुंबाबाहेरचे अध्यक्ष म्हणून निवडले. पराभूत मानसिकतेत असणाऱ्या या पक्षाला खरगे यांनी सर्वसमावेशक नेतृत्व आणि कौशल्याच्या बळावर विश्वास गेल्या वर्षभरात दिला. योग्य समन्वय, संवाद आणि अनुभवाच्या बळावर त्यांनी कर्नाटकात भाजपचा पराभव करून गोंधळलेल्या काँग्रेसला सूर मिळवून दिला. काँग्रेस पक्ष मोदी–शहा यांना टक्कर देऊ शकतो, ही उमेद दिली. देशाला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या गांधी–नेहरूंच्या १३८ वर्षीय काँग्रेसला नामशेष करण्याच्या आरोळ्या पंतप्रधानदेखील प्रचारसभांतून देत असताना, खरगेंनी दक्षिण भारतातल्या एकमेव राज्यातून भाजपला मुक्त केले आणि काँग्रेस जिवंत राहील हे कृतीतून दाखवून दिले.

अनेक वेळा अनेकांनी काँग्रेसवर गांधी कुटुंबाच्या घराणेशाहीचा आरोप केला आहे. मात्र गेल्या दशकभरात, भाजपच्या आरोपांनी काँग्रेस पहिल्यांदाच कधी नव्हे एवढी घायाळ झाली. विशेषत: २०१९ नंतर मोदी–शहांच्या आक्रमक राजकारणामुळे विरोधी पक्षांची अवस्था केविलवाणी झाली. मोदींनी भल्याबुऱ्या पद्धतीने सत्ता राबवून अन्य पक्षीयांना जेरीस आणले. अनेकांना तुरुंगात पाठवले, अनेकांची संपत्ती गोठवली, तपासयंत्रणांकडून नोटिसा धाडल्या, धाडी घातल्या, अनेक राज्यांतील सरकारे पाडून भाजपला त्या त्या राज्यात सत्ता मिळवून दिली. अनेकांवर भ्रष्टाचाराचे आरोप केले. याचा सर्वाधिक परिणाम काँग्रेसवर झाला. काँग्रेसमधील अनेक 'धनवान' नेतेमंडळी भाजपच्या 'वॉशिंग मशीन'मधून पवित्र होण्याची धडपड करू लागली होती. ज्योतिरादित्य सिंदिया, हेमंत बिस्वा सरमा, जगदम्बिका पाल, चौधरी बिरेंद्र सिंह, एस. एम. कृष्णा यांच्यासारखे कधीकाळचे काँग्रेसनिष्ठ पक्षनेतृत्वावर आरोप करून भाजपत गेले. काही नेते जी–२३ सारखा गट तयार करत होते. पक्षाला लोकसभेत, विविध राज्यांच्या विधानसभेत यश मिळत नव्हते. अशा संकटकाळात काँग्रेसला तारण्याचे मोठे शिवधनुष्य काँग्रेसच्या नऊ हजार ५४८ मतदारांपैकी सात हजार ८९७ मतदारांनी, काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी खरगेंच्या खांद्यावर दिले. खरगेंनीही वर्षभरात आपल्या सर्वसमावेशक नेतृत्वकौशल्याने काँग्रेसला कूस बदलण्यास भाग पाडले आहे. खरगे पक्षाध्यक्ष झाल्यानंतरच भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या गृहराज्यात हिमाचल प्रदेशात प्रियंका गांधी आणि खरगेंच्या मेहनतीने राज्याला काँग्रेसचा मुख्यमंत्री मिळाला. खरगेंनी स्वत:च्या गृहराज्यात, कर्नाटकात भाजपचा दारुण पराभव केला. काँग्रेस गटबाजीने पोखरली आहे, ही चर्चा शिखरावर असताना कर्नाटकातील डी. के. शिवकुमार आणि सिद्धरमय्या यांच्यात खरगेंनी योग्य समन्वय केला. राजस्थानात अशोक गेहलोत आणि सचिन पायलट, छत्तीसगढमध्ये भूपेश बघेल आणि टी. एस. देव यांच्यात यशस्वी सामोपचार घडवला. मध्य प्रदेशात स्थानिक नेतृत्वाला सर्वाधिकार देत स्वतंत्रपणे निवडणूक लढण्याची मुभा दिली. त्यांनी आज छत्तीसगढ, मध्य प्रदेश, राजस्थानात काँग्रेस जिंकेल अशा स्थितीत पक्ष उभा केला आहे. तेलंगणासारख्या राज्यात पक्षाला प्रमुख प्रतिस्पर्ध्याच्या तुलनेत उभे केले आहे. काँग्रेसनिष्ठ विचारांची पक्की बैठक असलेल्या खरगेंनी आपल्या नीतिमत्तेच्या बळावर राजकारण केले. कर्नाटकात त्यांची मुख्यमंत्रीपदाची संधी पक्षनेतृत्वाने तीन वेळा घालवली. अशाही परिस्थितीत खरगेंनी पक्षाला कधीही दुय्यम स्थान दिले नाही. काँग्रेसचा विचार, सामाजिक न्यायाची भूमिका, स्पष्टवक्तेपणा, भाजपच्या आक्रमक राजकारणाला थेटपणे भिडण्याचा स्वभाव, तटस्थपणा, कुठल्याही दबावाला बळी न पडता संसदेत आणि संसदेबाहेर भाजपला टोचतील असे प्रश्न विचारण्याचा खमकेपणा त्यांचे राजकारण अधिक प्रगल्भ करतो. त्यांनी पक्षात दिलेले योगदान, बाळगलेली निष्ठा ५१ वर्षांच्या प्रदीर्घ राजकीय जीवनात कधीही भ्रष्टाचाराचा आरोप न झालेली त्यांची स्वच्छ प्रतिमा, त्यांचे पक्षातील नैतिक अधिष्ठान वाढवते. त्याच नैतिकतेच्या बळावर खरगेंनी काँग्रेसला हळुवारपणे हवे तसे बदलण्याचा प्रयत्न चालवला आहे. त्या प्रयत्नाचा भाग म्हणूनच आज देशात होत असलेल्या पाच राज्यांच्या निवडणुकीत काँग्रेस एकसंधपणे मोठ्या विश्वासाने निवडणुकीला सामोरा जात आहे. विरोधकांच्या इंडिया आघाडीत काँग्रेसला त्यांनी केंद्रस्थानी आणले आहे.खरे तर, काँग्रेसचे नवे अध्यक्ष रबरस्टॅम्पप्रमाणे काम करतील हा विरोधकांचा आणि पत्रकारांचा दावा खरगेंनी खोटा ठरवला आहे. अध्यक्षपदाच्या निवडीसाठी उमेदवारी अर्ज भरतानाच त्यांनी आपल्या सर्वसमावेशक बहुआयामी नेतृत्वाची छाप राष्ट्रीय राजकारणात पाडली होती. जी–२३ गटाची वर्षभर होत असलेली चर्चा खरगेंनी उमेदवारी अर्ज भरतानाच संपवली. सर्वांना सोबत घेऊन ते विजयी झाले. अध्यक्षपदाचा स्वीकार केल्यानंतर त्यांनी पक्षातील अनेक वादविवाद मिटवले.

# कोण, कसं वाचवणार?

मुंबईचा ताजा अनुभव पाहाता बेकायदा बांधकामांना पायबंद, बांधकाम प्रक्रियेवर वचक हे उपाय प्राथमिक आहेत, त्याखेरीज आपली शहरे लोकांसाठी सुसह्य होण्याचे उपायही करावे लागतील प्रा. एच. एम. देसरडा ' शहर विकास' या गोंडस नावाने गेल्या काही दशकांपासून आपल्या शहरांमध्ये प्रचंड विध्वंस होत आहे. रात्रंदिवस जेसीबीने तोडफोड, राडारोडा, बांधकाम साहित्याची ट्रक–ट्रॅक्टरद्वारे वाहतूक, लोखंडी सळ्यांची कापणी, सेंटरिंगची ठोकाठोक, बांधकाम स्थळीच वेल्डिंग, फरश्यांचे कटिंग हे सर्व बिनधास्त, बेबंद, आडदांड, अरेरावी पद्धतीने राजरोस चाललेले आहे. याला धूळ, ध्वनी प्रदूषणाच्या धोक्याशी कोणतेही देणेघेणे नाही! थोडक्यात, भूखंडाचे मालक, दलाल, कंत्राटदार, अधिकारपत्रधारक, विकासक, बिल्डर, या समस्त धनदांडग्या प्रभावळीचे व त्यांचे पाठीराखे लोकप्रतिनिधी–पदाधिकारी–अधिकारी यांचे संगनमत व अभद्रयुतीमुळे हा धूमधडाका राजरोस वर्षानुवर्षे चालला आहे या अनियंत्रित बांधकामांचा मोठा हात मुंबईचे हवा–प्रदूषण वाढवण्यात आहे, याची कबुली अखेर गेल्या आठवड्यात मिळाली! मुंबईच्या बांधकाम प्रदूषणाने घातलेल्या थैमानाबाबत जी ठळक बातमी वृत्तपत्रांत झळकली ती डोळ्यात अंजन घालणारी आहे. महापालिकेचे प्रशासक इकबालसिंग चहल यांनी मुंबईत सहा हजार बांधकामांना नियम पाळण्याची तंबी दिली. बांधकाम करताना धूलिकण इतस्तत: पसरू नये यासाठी उंच पत्रे लावणे, पाणी फवारणे यांसह अनेक निर्बंध पाळण्यास सांगितले आहे. यापूर्वी गेल्या वर्षी दिल्लीत सर्व बांधकामे स्थगित ठेवण्यात आली होती.या हवा–प्रदूषणाच्या परिणामी शहर बकाल, बेबंद, कायम आजारग्रस्त असते, धूलिकणांचे हवेतील प्रमाण धोका पातळीच्या कैकपट अधिक असून यामुळे श्वसनाचे आजार ही घरोघरची त्रासदी आहे. ध्वनिप्रदूषणामुळे बालके, वृद्धच काय कोणताही माणूस नीट झोपू शकत नाही. निद्रानाशाचे आजार ही सामान्य बाब बनली आहे. ऊन, प्रकाश, हवेसाठी घराला दारे–खिडक्या असतात पण त्या कायम बंद ठेवाव्या लागतात! श्रीमंत लोक करतात वातानुकूलिततेची, हवा शुद्धीकरण सयंत्राची (एअरप्युरिफायर) सोय!!सर्वसामान्य नागरिकांना काय तर दुर्गंधी, डास व सर्व तऱ्हेच्या प्रदूषणाची मनपा भेट! थोड्याथोडक्या नव्हे तर किमान ८० टक्के लोकसंख्येला या नरकपुरीत जगावे लागते. तब्बल निम्मेअधिक 'शहरवासीय' झोपडपट्ट्या, बकालवस्त्या व नळ पाण्याच्या अभावग्रस्तेत एक दोन खोल्यात राहण्यास मजबूर आहेत.प्रश्न आहे की हा सर्व शहर विकास–विस्ताराचा खटाटोप, त्यासाठी अब्जावधींची तरतूद, राज्य व केंद्राचे अर्थसाह्य, कर्ज कशासाठी? तर म्हणे 'स्मार्टसिटी बनविण्यासाठी'! होय, शहर स्वच्छ, आरोग्यदायी, मानवी, राहण्यालायक (लिव्हेबल) असणे गरजेचे आहे. संविधानाने व अन्य कायद्यांनी प्रत्येक नागरिकाला स्वच्छ हवापाणी, विषमुक्त अन्न, गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा, दर्जेदार शिक्षण, योग्यनिवारा, ऊर्जा व वाहतूक सेवासुविधांचा हक्क प्रदान केला आहे. मात्र, स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतर ७० टक्के नागरिक यापासून वंचित आहेत. यासाठी केंद्राच्या, राज्याच्या आणि स्थानिक स्वराज्य संस्थाच्या अर्थसंकल्पात मुबलक तरतूदी तसेच सेवासुविधा पुरवणाऱ्या यंत्रणाचा मोठा लवाजमा आहे. तथापि ते जबाबदेही मानत नाही. आता तर महाराष्ट्रासह राज्यांनी यासाठी 'सेवाहमी कायदा' केला; तरी पण.कैफियत एका शहराची! प्रस्तुत लेखक गेली ६५ वर्षे औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) शहरात वास्तव्यास आहेत. जुन्या व नव्या शहरातील वेगवेगळ्या ठिकाणी राहिले; किमान दहा भाड्याच्या घरात. अनुभव हा आहे की भुखंडाच्या किमती भरमसाठ वाढल्यामुळे कोणत्याही वस्तीत चांगली राहण्यायोग्य घरे पाडून बहुमजली फ्लॅट, कुठेही दुकाने, व्यापारी संकुले बांधली जातात. पर्यावरणाच्या दृष्टीने हे हानीकारक आहेच. सोबतच धूळ व अन्य प्रदूषणामुळे मानवी आरोग्यास घातक आहे. मुळातच जी घरे व वास्तू राहण्या–वापरण्या योग्य आहे त्या पाडण्यास कुठल्याही सबबीखाली परवानगी देण्यात येऊ नये. बांधकाम साहित्य व श्रमाचा हा अपव्यय आहे. मात्र, प्रत्येक शहरात हे हमखास घडत असून यात नगरनियोजन शहर आराखड्याचे सर्व नियम धाब्यावर बसवले जातात! बांधकाम क्षेत्र हा भ्रष्टाचाराचा अड्डा असल्यामुळे प्रत्येक वास्तू व रचना ही नियम उल्लंघन करणारी असते. अपवाद वगळता दरऐक शहर नियमबाह्य पद्धतीनेच वाढत विस्तारत आहे, गंमत म्हणजे ज्या क्षेत्राला 'रिअल इस्टेट' असे साळसूद नाव आहे, ते धादांत खोटेनाटे, सबझूट असे क्षेत्र आहे! मुख्यमंत्री, अन्यमंत्री यांच्याशी तमाम बडे बिल्डर यांचे 'अर्थपूर्ण' संबंध मुंबईच्या बॅकबे रेक्लमेशन पासून देशभर सर्वत्र सर्वज्ञात आहेत. किंबहुना या सर्व प्रकारच्या बांधकाम प्रकल्पांनी देशात भ्रष्टाचाराची महासाखळी उभी राहिली असून हा राक्षस सर्व काही बरबाद करत आहे.अवैध बांधकामाबाबत छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शहराची स्थिती अत्यंत संतापजनक आहे. १९७० च्या दशकात डॉ. रफिक झकेरिया यांनी महतप्रयासाने 'सिडको'च्या रूपाने नवीन नियोजित शहर उभारण्याचा प्रयत्न केला. पहिली दोन दशके नगरनियोजन आराखड्यानुसार हे ठीकठाक चालले होते. मात्र, जसजशा जमिनीच्या किमती वाढू लागल्या सिडको प्रकल्प हा उच्चपदस्थ नेत्यांच्या आशीर्वादाने जमीन–बळकाव प्रकल्प बनला. अलगदपणे यामुळे बिल्डर–विकासक नावाची जमात फोफवली. गत पाच दशकात भूखंडांच्या किमती शंभरपटीहून अधिक झाल्या. नगरनियोजनाचे तमाम नियम धाब्यावर बसवत बांधकामे होत आहेत. प्रस्तुत लेखकाच्या जनहित याचिकेनंतर याला पायबंद घालण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिले. परंतु सामदामदंडभेदाने नियमास मुरड घालत तसेच 'गुंठेवारी' तंत्राने अवैध बाबी जारी आहेत. जुन्या शहरात तर कशालाच धरबंद नाही; किती मजले असावेत, बांधकाम नियम उपनियम सर्व कागदावरच शिल्लक! यामुळेच शहर आज अजिबात राहण्यायोग्य राहिले नसून शहरात भ्रष्टाचार व मनगटशाहीचे राज्य आहे, असे खेदाने म्हणावे लागेल. याचा संचयी व चक्राकार परिणाम म्हणजे शहर बकाल, बेबंद, विद्रुप, विकृत व उद्ध्वस्त अवस्थेत पोहचले आहे. कितीही अप्रिय वाटले तरी हे ढळढळीत वास्तव आहे; हे नाकारून या महाभ्रष्टाचाराचे निराकरण कसे होणार? हे आकडे पाहा भारतात लहान मोठी आठ हजार शहरे असून त्यात सुमारे ५० कोटी लोक राहतात. येत्या २५ वर्षात शहरांची लोकसंख्या ८५ कोटीवर पोहचेल. नीती आयोगाच्या अहवालानूसार ६५ टक्के शहरांच्या विकासाचा आराखडा (मॉस्टरप्लान) नाही. त्यामुळे अनियोजित नगरपसारा, अस्ताव्यस्त मनमानी बांधकामे, कमालीचे प्रदूषण अशी त्यांची गलितगात्र स्थिती आहे. एवढेच काय दिल्ली मुबईसारखी महानगरे देखील नियोजनशून्य जाणवतात! जगातील ३० अतिप्रदूषित शहरांपैकी २१ भारतात आहेत. राजधानी दिल्लीच्या हवा प्रदूषणाची चर्चा गेली कित्येक वर्षे होत असून देशातील १४ कोटीहून अधिक लोक वायूप्रदूषणग्रस्त आहेत. त्यांना स्वच्छ हवेच्या मानाकंनाच्या दसपट अधिक प्रदूषित हवा शरीरात घ्यावी लागते. धुळीकण (परटिक्युलेट म्याटर) आकार व प्रमाण दहावीसपट अधिक आहे. अर्थात , हे आरोग्यास अत्यंत घातक असून लोकांच्या स्वास्थ व जीवनमानावर त्याचा प्रतिकूल परिणाम होत आहे.या विळख्यातून सुटकेसाठी काय करावे? ही पार्श्वभूमी व परिप्रेक्ष्य समोर ठेवून नागरिकांनी मनपा प्रशासनास व राज्य सरकारला पुढील काही बाबी अग्रक्रमाने करण्यासाठी संघटितपणे आवाज उठविला पाहिजे.(१) संपूर्ण शहरातील सार्वजनिक, संस्थात्मक खासगी मालमत्ता (मोकळे भूखंड, बांधकामे) यांची प्रत्यक्ष पाहणी आधारित गणना करून वास्तवदर्शी नोंद घ्यावी. भूखंडाची वैधता, बांधकामाचे क्षेत्र, चटईक्षेत्र (परमिसेबल एफएसआय) उल्लंघन, नियमन पात्रता इत्यादि इतंभूत तपशील नोंदविला जावा.(२) शहराच्या 'नगरनियोजन आराखड्या'चे आजवर जे अगणित मसुदे प्रस्तुत करण्यात आले ते सर्व गोंधळ वाढवणारे असल्यामुळे नव्याने एक शास्त्रशुद्ध परिपूर्ण आराखडा नागरिकांच्या व्यापक सूचनार्थ प्रस्तुत करण्यात यावा. सामाजिक–पर्यावरणीय पैलूंच्या अद्ययावत संकल्पनांनुसारच तो आहे, याची खातरजमा करून घ्यावी.(३) सामान्य जनता, श्रमजीवी वर्ग, दुर्बल घटक यांना अद्ययावत नागरिक सेवासुविधा परवडणाऱ्या शुल्कात पुरविल्या जाव्यात यासाठी महापालिकेचे उत्पन्न अनेक पटीने वाढण्याची नितांत गरज आहे. त्यासाठी सर्व मालमत्तांची किंमत प्रचलित बाजारभावानुसार मुक्रर करून प्रगतिशील पद्धतीने त्यावर मालमत्ता कर आकारण्यात यावा. मालमत्तांच्या किंमतींच्या किमान दहा टक्के रक्कम कर रूपाने मनपास मिळावयास हवा. असे केले तरच मनपा प्रशासनाकडे गुणवत्तापूर्ण सेवासुविधा पुरवण्यास पुरेसा निधी असेल. याखेरीज व्यापारी प्रतिष्ठाने आणि उच्च उत्पन्न गटाला जलपुरवठा करताना पाणी मोजून देण्यात यावे. दररोज शंभर लिटरपेक्षा जास्त पाणी वापरणाऱ्या नळधारकासाठी पाणीपट्टी तितक्या प्रमाणात वाढविण्यात यावी.(४) झोपडपट्ट्या अथवा प्राथमिक सुविधा/ स्वच्छतेचा अभाव असलेल्या एकदोन खोल्यात दाटीवाटीने राहणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण मोठे आहे. मुख्य म्हणजे हे कष्टकरी लोक शहरांचे तमाम व्यापारउदीम, मूलभूत सेवासुविधा कार्यरत ठेवतात. या समूहासाठी गृहनिर्माण करण्याची नितांत गरज आहे. सामाजिक न्याय व पर्यावरण रक्षणासाठी हे आवश्यक आहे.( ५) सध्या मनपाचा बांधकाम परवाना विभाग अनागोंदी, अकार्यक्षमता व भ्रष्टाचारग्रस्त असल्यामुळे अवैध बांधकामांना उधाण आले असून त्यामुळे 'नियोजित शहर' संकल्पना मोडीत निघाली आहे. त्यात आमूलाग्र बदल करून त्याचे व्यावसायीकरण, अद्यावतीकरण करणे नितांत गरजेचे आहे. यात रूढ झालेली टक्केवारी साखळी भेदण्यासाठी वास्तू–रचनाकार / विशारद यांचे व्यावसायिक दायित्त नीट ठरवून काही उल्लंघन नियम बाह्यता झाल्यास त्यांची जबाबदारी निश्चित केली जावी. त्यांनी व्यावसायिक दायित्त्व नितीमत्ता न पाळल्यास दंड, अपात्रता, नुकसान भरपाई यासारख्या तरतुदी असाव्यात. विकासक–बिल्डर–कंत्राटदार यांच्यावरही तेवढेच कठोर सहदायित्व असावे. तरच शहरोशहरी फोफावलेल्या महाभ्रष्टाचाराला आवर घालता येईल.(७) घरकाम करणाऱ्या महिला, अंगमेहनत करणारे तसचे शासकीय शाळेतील विद्यार्थी यांना मनपाने शहर बस वाहतूक सेवेत सवलत द्यावी.(८) महापालिकेने प्रत्येक वार्डात प्राथमिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्यावी. सोबतच रेफरल / विशेषज्ञ सेवेशी सांगड घालून सेवासाखळीची सोय करून द्यावी. शहरात ठायीठायी स्त्रीपुरुषांसाठी स्वच्छता, सुविधा गृहे (टॉयलेट) उभारावीत. शहरातील प्रत्येक वॉर्डात पाळणाघरे, बालसंगोपन केंद्रेही आवश्यक आहेत. अंगणवाडी उपक्रम कार्यक्षमतेने राबविण्यात यावे.(९) बेसहारा, निराधारांसाठी निवारा केंद्रे असावीत जेणेकरून ऊन, थंडी, पाऊस व तत्सम गरजेच्या वेळी ते तेथे आसरा घेऊ शकतील. थोडक्यात, शहरात कुणी उपाशी, कुपोषित, आजारी, बेघर, दुर्लक्षित, असुरक्षितपणे जगण्यास मजबूर नसावा.(१०) प्रत्येक वार्डात दर आठवड्यात नागरिकांची बैठक घेऊन नागरिसेवासुविधा सुरळीतपणे सुरू असून त्यात सुधारणाविषयी विचार होत राहावा. सेवा हमी कायद्यानुसार, महापालिकेच्या अखत्यारितील सर्व सेवासुविधा प्रत्येक रहिवास्यास घरपोच मिळण्याची चोख व्यवस्था मनपाने करावी.हे सर्व उपाय करणे आर्थिकदृष्ट्या शक्य व आवश्यक आहे. गरज आहे प्रशासकीय इमानदारी, सामाजिक नैतिकता व राजकीय दृढ संकल्पाची; आणि लोकसंघटन, जनआंदोलनाची. प्रत्येकाने आपलं शहर स्वच्छ, सुंदर तणाव–हिंसामुक्त व मानवीय करण्याचा संकल्प करणे हे आपले नागरिक कर्तव्य आहे.

लेखक अर्थतज्ज्ञ असून महाराष्ट्र राज्य नियोजन मंडळाचे माजी सदस्य आहेत.

# हिमनगाचे टोकच फक्त!

नांदेड येथील शंकरराव चव्हाण शासकीय वैद्याकीय महाविद्यालय (जीएमसी) रुग्णालयात १ ऑक्टोबर २०२३ या तारखेला २४ तासांच्या कालावधीत २४ मृत्यू झाले. शैलजा आराळकर, दीपक जाधव नांदेड येथील शासकीय रुग्णालयात २४ जणांचा मृत्यू झाल्याच्या घटनेनंतर जन आरोग्य अभियानाच्या वतीने एक सत्यशोधन समिती तिथे पाठवण्यात आली होती. या समितीने नुकताच तिचा अहवाल सादर केला आहे. नांदेड येथील शंकरराव चव्हाण शासकीय वैद्याकीय महाविद्यालय (जीएमसी) रुग्णालयात १ ऑक्टोबर २०२३ या तारखेला २४ तासांच्या कालावधीत २४ मृत्यू झाले. इतक्या मोठ्या प्रमाणात मृत्यू झाल्याने वृत्तवाहिन्या, वृत्तपत्रे व सर्व डिजिटल माध्यमांनी या घटनेचे सविस्तर वृत्तांकन केले. राज्यातील विरोधी पक्षांचे प्रमुख नेते, आरोग्य चळवळीतील कार्यकर्ते, सामान्य नागरिक अशा सर्व थरांतून यावर प्रतिक्रिया उमटल्या.नांदेडच्या घटनेनंतर जन आरोग्य अभियानाच्या वतीने एक सत्यशोधन समिती नांदेडला पाठवण्यात आली. या समितीमध्ये सार्वजनिक आरोग्यतज्ज्ञ, डॉक्टर, आरोग्य हक्क कार्यकर्ते व स्थानिक सामाजिक कार्यकर्ते यांचा समावेश होता. जन आरोग्य अभियान गेल्या २२ वर्षांपासून सार्वजनिक आरोग्य चळवळीत कार्यरत आहे. सरकारी आरोग्य सेवांची यंत्रणा सक्षम झाली पाहिजे, आरोग्याच्या तरतुदीमध्ये भरीव वाढ झाली पाहिजे हा मुद्दा जन आरोग्य अभियानाने सातत्याने उचलला आहे. त्यामुळे अभियानाकडून नांदेडला पाठवण्यात आलेल्या सत्यशोधन समितीने अत्यंत गांभीर्याने या घटनेची सर्व अंगांनी पाहणी, अभ्यास व तपास केला. याबाबतचा सविस्तर अहवाल नुकताच समितीने प्रकाशित केला आहे.नांदेडमधील जीएमसी हॉस्पिटल, सिव्हिल हॉस्पिटल, महिला हॉस्पिटल आणि नागरी सामुदायिक आरोग्य केंद्रासह विविध सार्वजनिक आरोग्य सुविधांना सत्यशोधन समिती सदस्यांनी भेट दिली. रुग्णालयाचे प्रशासक, वरिष्ठ आणि कनिष्ठ सरकारी डॉक्टर, परिचारिका, खासगी डॉक्टर आणि स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांकडून सदस्यांनी माहिती गोळा केली. त्याचबरोबर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील सार्वजनिक आरोग्य सेवांबाबतही माहिती घेण्यात आली. समितीच्या असे निदर्शनास आले की, नांदेड वैद्याकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयावर वाढत्या रुग्णसंख्येमुळे कामाचा मोठा ताण पडत आहे. जिल्हा व तालुकास्तरावर सार्वजनिक क्षेत्रात तज्ज्ञ उपचार सुविधांची (स्पेशालिस्ट केअर) कमतरता असल्याचा तो स्पष्ट परिणाम आहे. जीएमसी नोंदलेल्या २४ मृत्यूंपैकी ११ नवजात बालकांचे होते. त्यामुळे निओनेटल इंटेन्सिव्ह केअर युनिटची (एनआयसीयू) पाहणी पहिल्यांदा करण्यात आली. या युनिटसाठी पाच पाळण्यांची मंजुरी आहे, प्रत्यक्षात वापरात असलेल्या पाळण्यांची संख्या २० आहे, परंतु बालरुग्णांचा ओघ प्रचंड असल्यामुळे अनेकदा ६० पेक्षा जास्त नवजात बालकांना दाखल करून घेतले जाते. म्हणून दोन ते तीन बाळांना एका पाळण्यात ठेवण्याची वेळ येते. शिवाय, एनआयसीयूमधील परिचारिकांची संख्या रुग्णांच्या मानाने खूपच कमी आहे. अधिकृत गुणोत्तरानुसार प्रत्येक पाळीमध्ये दोन नवजात मुलांमागे एक परिचारिका असायला हवी, म्हणजेच प्रत्येक पाळीमध्ये किमान दहा परिचारिका हजर असायला हव्या. पण प्रत्यक्षात मात्र प्रत्येक पाळीमध्ये दोन–तीन परिचारिकाच असतात. याचाच अर्थ सध्या एनआयसीयूमध्ये परिचारिका (नर्स) यांची नेमणूक आवश्यकतेपेक्षा चार ते पाचपट कमी आहे.जीएमसीच्या बालरोग विभागामध्ये सध्या एकूण पाच कनिष्ठ निवासी डॉक्टर कार्यरत आहेत. त्यापैकी एक किंवा दोन निवासी डॉक्टरांवर एनआयसीयूच्या सर्व शिफ्ट्स कव्हर करण्याची जबाबदारी सोपवली जाते. ते डॉक्टर रुग्णसेवा देण्याचा प्रयत्न करत आहेत, पण त्यांना अनेकदा जवळजवळ २४ तास काम करावे लागत आहे. त्यांच्यावरील कामाच्या या अति ताणामुळे नवजात बालरुग्णांची काळजी घेणे, तसेच त्यांच्या एमडी अभ्यासक्रमादरम्यान अपेक्षित असलेले आवश्यक शिक्षण व प्रशिक्षण घेणे या दोन्हींवर याचा परिणाम होण्याची शक्यता आहे.एनआयसीयूमध्ये दोन स्वतंत्र विभाग असले पाहिजेत – एक संसर्ग नसलेल्या नवजात मुलांसाठी, आणि दुसरा संक्रमणासाठी उपचार घेत असलेल्या नवजात मुलांसाठी. या दोन्ही विभागांसाठी पुरेशा प्रमाणात परिचारिकांची नियुक्ती केली जावी. या दोन्ही विभागांतील परिचारिका वेगळ्या असल्या तर अतिसंवेदनशील नवजात बालकांना होणारे संसर्ग टाळले जाऊ शकतील.जीएमसी रुग्णालयाची क्षमता ५०० रुग्णांची असूनही प्रत्यक्षात मात्र ११०० रुग्णांहून अधिक रुग्ण तिथे दाखल होतात. यामुळे एकूण यंत्रणेवर अति ताण येत आहे. जीएमसीमधील एमबीबीएस विद्यार्थ्यांची संख्या १०० वरून १५० पर्यंत वाढवण्यात आली आहे; परंतु प्राध्यापकांच्या संख्येत आणि पायाभूत सुविधांमध्ये या प्रमाणात वाढ झालेली नाही. महाराष्ट्राच्या इतर भागांमध्ये नवीन शासकीय वैद्याकीय महाविद्यालये सुरू होत आहेत आणि जीएमसीमधील काही विद्यमान प्राध्यापकांना प्रतिनियुक्तीवर नवीन महाविद्यालयांमध्ये हलविण्यात आले आहे. यामुळे प्राध्यापकांची संख्या आणखी कमी होत आहे.जीएमसी रुग्णालयात वाढलेल्या मृत्यूंची शोकांतिका नांदेड विभागातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेमध्ये विशेषज्ञ आरोग्य सेवांच्या अपुऱ्या तरतुदीशी थेट जोडलेली आहे. नांदेड शहराच्या आजूबाजूच्या १०० किलोमीटरच्या परिघात कोणत्याही सुसज्ज तृतीय स्तराच्या सार्वजनिक आरोग्य सुविधा नाहीत. परिणामी, नांदेड जिल्ह्यातील रुग्ण, तसेच परभणी, हिंगोली, यवतमाळ आणि लातूरमधील अनेक तालुके आणि तेलंगणा आणि कर्नाटकातील काही जिल्ह्यांतील रुग्ण जीएमसी रुग्णालयात पाठवले जातात. नांदेडमधील गुरू गोविंदसिंग सिव्हिल हॉस्पिटलमध्ये फक्त १०० खाटा आहेत. ३४ लाखांपेक्षा जास्त लोकसंख्येच्या जिल्हास्तरीय आरोग्य सुविधांसाठी हे अपुरे आहे. या लोकसंख्येच्या जिल्ह्यासाठी ५०० ते ७०० खाटा जिल्हा रुग्णालयात असण्याची गरज भारतीय सार्वजनिक आरोग्य मानकानुसार आवश्यक आहे.नांदेड जिल्ह्यातील जीएमसीव्यतिरिक्त, सार्वजनिक आरोग्य सुविधांमध्ये विशेषत: अपुरे तज्ज्ञ डॉक्टर, बालरोगतज्ज्ञ ही एक गंभीर समस्या आहे. या सर्व सार्वजनिक रुग्णालयांमध्ये (महिला रुग्णालय वगळता) विशेष नवजात केअर युनिट्स (एसएनसीयू) आणि योग्य बालरोग वॉर्डांचा अभाव आहे. सिव्हिल हॉस्पिटलमध्ये फक्त एकच बालरोगतज्ज्ञ असून लहान मुलांसाठी स्वतंत्र बालरोग वॉर्ड नाही. उपजिल्हा रुग्णालये आणि ग्रामीण रुग्णालये यांनी बालरोग सेवा प्रदान करणे अपेक्षित आहे. परंतु सहा उपजिल्हा रुग्णालयांसाठी फक्त सहा बालरोगतज्ज्ञ आहेत. तसेच १२ ग्रामीण रुग्णालयांसाठी फक्त सात बालरोगतज्ज्ञ आहेत. तेदेखील अनेकदा पूर्ण–वेळ उपलब्ध नसतात. त्यामुळे नांदेडमधील या १९ वेगवेगळ्या सरकारी रुग्णालयांमधून (एक सिव्हिल हॉस्पिटल, सर्व सहा एसडीएच आणि सर्व १२ ग्रामीण रुग्णालये) बहुतेक आजारी नवजात बालकांना जीएमसी नांदेडकडे पाठवले जात आहे.केंद्र व राज्य शासनाच्या आरोग्य विमा योजनांच्या अपयशामुळेही जीएमसीमध्ये रुग्ण उपचारासाठी जाण्याचे प्रमाण वाढत आहे. महाराष्ट्र वैद्याकीय परिषदेच्या यादीत नांदेड जिल्ह्यातील दोन हजारांहून अधिक डॉक्टरांची नोंदणी आहे. नांदेड शहरामध्ये ४८० खासगी रुग्णालये व क्लिनिक आहेत. मात्र महाराष्ट्र सरकारच्या 'महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना' (एमजेपीजेएवाय) योजनेअंतर्गत नांदेडमध्ये केवळ दोन खासगी रुग्णालये नवजात बालकांसाठी उपचार सुविधा पुरवतात. त्यामुळे गरीब व गरजू पालकांच्या नवजात बालकांना या योजनेचा फारसा लाभ मिळत नसल्याचे दिसून येते. आरोग्य योजना आरोग्य व्यवस्थेला पर्याय असू शकत नाहीत याचा हा आणखी एक पुरावा आहे. नांदेडमधील काही खासगी रुग्णालये, गंभीर आजार असलेल्या रुग्णांना शेवटच्या वेळेला 'डंपिंग' करण्यासाठी जीएमसी रुग्णालयात पाठवतात, त्यामुळेही या ठिकाणी होणाऱ्या मृत्यूंत वाढ होते आहे.एकंदरीत जीएमसी रुग्णालयात झालेले हे मृत्यू, राज्य शासनाच्या आरोग्य यंत्रणेचे एक बहुआयामी संकट आहे. तालुकास्तरावर तसेच जिल्ह्याच्या स्तरावरही पुरेशा प्रमाणात तज्ज्ञ उपचार सुविधा उपलब्ध नसणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. त्याचबरोबर आवश्यक मनुष्यबळ व संसाधने आणि औषधे यांची कमतरता याचा मोठा फटका जीएमसी रुग्णालयास बसतो आहे. त्यामुळे नांदेडची घटना हे संपूर्ण आरोग्य व्यवस्थेचे अपयश मानावे लागेल तसेच महाराष्ट्राच्या सत्ताधारी राजकीय नेतृत्वाला या अपयशाची जबाबदारी स्वीकारावी लागेल.सार्वजनिक आरोग्य आणि वैद्याकीय शिक्षणावर खर्च केलेल्या तरतुदीच्या टक्केवारीनुसार २८ भारतीय राज्यांची क्रमवारी लावली तर, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या अहवालानुसार महाराष्ट्र अगदी तळाशी आहे. राष्ट्रीय आरोग्य धोरण २०१७ नुसार प्रत्येक राज्य सरकारने त्याच्या अर्थसंकल्पाच्या आठ टक्के खर्च आरोग्यावर करणे आवश्यक आहे. पण महाराष्ट्राच्या अर्थसंकल्प २०२२–२३ मध्ये सार्वजनिक आरोग्य आणि वैद्याकीय शिक्षणासाठी एकूण फक्त ४.१ टक्के इतकी तरतूद करण्यात आली आहे. इतर सर्व राज्यांच्या तुलनेत हे प्रमाण सर्वात कमी आहे. त्याहून अधिक धक्कादायक म्हणजे महाराष्ट्र शासन आरोग्यासाठी अंदाजपत्रकात अपुरी तरतूद करते, तीदेखील पूर्ण खर्च केली जात नाही. यंदाच्या आर्थिक वर्षात (२०२३–२४) २०० दिवस संपल्यानंतर बजेटच्या ५५ टक्के निधी खर्च होणे अपेक्षित आहे. पण प्रत्यक्षात आतापर्यंत सार्वजनिक आरोग्य विभागाचा ३९ टक्के आणि वैद्याकीय शिक्षण विभागाचा फक्त ३७ टक्के निधी खर्च झाला आहे.नांदेडच्या घटनेचे सार्वजनिक लेखापरीक्षण करणे, सार्वजनिक आरोग्याबाबत महाराष्ट्र विधानसभेचे विशेष अधिवेशन बोलवणे, राज्याचे आरोग्य तरतूद दुप्पट करणे, राज्यस्तरीय आरोग्य मानवशक्ती धोरण (हेल्थ ह्युमन– पॉवर पॉलिसी) प्रस्थापित करणे, पारदर्शक आणि प्रभावी औषध खरेदी प्रणाली राज्य पातळीवर त्वरित स्वीकारणे आदी सर्व कृती तातडीने करणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील ग्रामीण भागातील तज्ज्ञ आणि मूलभूत आरोग्य सेवा बळकट करणे, सेवांना उत्तरदायी बनविण्यासाठी लोकाधारित देखरेख आणि नियमित सामाजिक लेखापरीक्षणाची अंमलबजावणी करणे, खासगी आरोग्य सेवा क्षेत्र व संबंधित विमा योजनांच्या कामकाजाचा आढावा घेणे हेदेखील तातडीने करणे आवश्यक आहे. या मृत्यूच्या तांडवानंतर तरी राजकारणी आणि महाराष्ट्रातील जनतेने खडबडून जागे व्हायला हवे. नांदेडच्या घटनेने शेवटची धोक्याची घंटा आपल्याला दिली आहे.महाराष्ट्रातील सर्व सामाजिक चळवळी आणि लोकहितवादी राजकीय शक्तींनी मिळून, महाराष्ट्रात आरोग्य सेवेचा अधिकार मिळवणे हा एक प्रमुख सामाजिक–राजकीय अजेंडा बनवण्यासाठी आता एकत्र आले पाहिजे.

# आरक्षण गरिबी हटाव कार्यक्रम नाही

देशात सध्या विचित्र परिस्थिती निर्माण करून देशाचे वाटोळे करून लोकांमध्ये अज्ञान वाढवून लोकांच्या बुद्धीशी खेळून लोकांना निष्क्रिय करून मुळ समस्येपासून लक्ष विचलित केले जात आहे. परंतु लोकांना याची जाणीव नाही. भारत हा जातीप्रधान देश असल्याने जातीव्यवस्था एवढी मजबूत आहे की जातीच्या उतरंडी मध्ये एक जात दुसऱ्या जातीला कनिष्ठ समजते. कनिष्ठ जातीने मोलाचे, जागृतीचे व सत्य विचार जरी सांगितले तरीही वरच्या जातीतील लोकांना पटत नाहीत. परंतु वरच्या जातीतील लोकांनी चुकिचे, खोटे, काल्पनिक विचार जरी सांगितले आणि त्या माध्यमातून लोकांचे शोषण जरी केले तरीही लोकांना चिड येत नाही उलट ते शोषण करणाऱ्यांना, दिशाभूल करून स्वतः चे पोटभरणाऱ्यांना गुरु स्थानी मानतात. थोडक्यात आजही गुण, विचार, बुद्धी याची पारख सत्यता बघुन नाही तर जात बघुनच केली जाते हे कोणीही नाकारू शकत नाही. एकीकडे सर्व खाजगी संपतीचे खाजगीकरण करून त्या उद्योगपतींना विकल्या जात आहेत. खाजगीकरणा मध्ये आरक्षण लागु नसते तरीही आरक्षणाचा मुद्दा सरकार कडून तानवून धरून लोकांना महागाई, बेरोजगारी, शिक्षण, आरोग्य, सुविधा, शेतमाल भाव, महिला प्रश्न, शेतकरी स्वहत्या अशा प्रश्नावर पडदा टाकुन आरक्षणाच्या माध्यमातून सामाजिक तेढ निर्माण करण्याचे चित्र उभे केले जात आहे. आरक्षणाचे क्षेत्रच शिल्लक नसतानाही आरक्षणा विषयी आंदोलन सुरू राहणे सरकारच्या फायद्याचे आहे. सध्या मराठा आरक्षणाचा मुद्दा सरकार दोन मिनटात सोडवू शकते परंतु सरकार मुद्दामहुन विषय वाढवत आहे. मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देऊन, ओबिसीची जातीनिहाय जनगणना करून ओबीसी संख्येनुसार आरक्षण मर्यादा वाढवणे एवढेच केले तरीही विषय संपतो परंतु सरकार उपकार केल्या सारखे वागुन विषय वाढवत आहे. दुसरी गोष्ट काही बरेच लोक आरक्षणाचा चुकिचा अर्थ काढून आरक्षणाची मांडणी चुकीच्या पद्धतीने करत आहेत. आरक्षणाचा संबंध थेट गरीबीशी जोडून गरिब आहोत म्हणून आरक्षण पाहिजे असे वक्तव्य केले जाते. मुळातच हे चुकीचे आहे. या साठी आरक्षणा मागची भुमीका लक्षात घेणे आवश्यक आहे. देशात सर्व प्रथम आरक्षण लागु केले ते राजर्षी शाहु महाराज यांनी. शाहु महाराज यांना आरक्षण लागु करण्याची गरज काय होती? याचे उत्तर शोधने आपले नैतिक कर्तव्य आहे. राजर्षी शाहु महाराज हे लोककल्याणकारी राजा होते. लोकांचा सर्वांगीण विकास म्हणजेच राज्याचा अर्थात देशाचा विकास असे शाहु महाराज यांचे स्पष्ट मत होते. राजर्षी शाहु महाराज राजे झाले आणि आपल्या राज्यात बघितले तर शिक्षण आणि नोकरी यावर ब्राह्मण वर्गाचीच मक्तेदारी होती. ब्राह्मण लोक अस्पृश्यता सोबतच जातीवाद भंयकर पाळत होते. म्हणून ब्राम्हणांसाठी बसण्यासाठी, जेवण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था व ब्राम्हणेतर लोकांसाठी इतर व्यवस्था होती. मानवतावादी राजर्षी शाहु महाराज यांना ह्या गोष्टी खटकल्या. शिक्षण आणि नोकरी यावर एकाच जाती धर्माची मक्तेदारी चालणार नाही, एकाच जातीची, वर्णाची मक्तेदारी ही देश विकासासाठी घातक आहे म्हणून सर्व जाती धर्मातील लोकांना शिक्षण व नोकरी मिळायला पाहिजे म्हणून राजर्षी शाहु महाराज यांनी आपल्या राज्यात पन्नास टक्के आरक्षण जाहीर करून कमीत कमी पन्नास लोक तरी ब्राम्हनेतर हे शिक्षण व नोकरी मध्ये पाहिजे अशी भुमिका होती. ब्राह्मण लोक जातीभेद पाळत होते, अस्पृश्यता पाळत होते. याच मुळे ते इतरांना आपल्या जवळ सुद्धा येऊ देत नव्हते. ब्राह्मण ज्या लोकांना जवळही येऊ देत नव्हते आरक्षणाच्या माध्यमातून राजर्षी शाहु महाराज यांनी ब्राम्हनेतर म्हणजे मांग, महार,चांभार, कुणबी, माळी या लोकांना ब्राम्हणांच्या बरोबरीने बसवून इतरांना सामाजिक प्रतिनिधित्व करण्याची संधी दिली. भारतात सकाळी सकाळी एका विशिष्ट जातीचे तोंड बघणे अपशकुन माणला जायचा, इतर जाती सोबत जेवणे पाप माणले जायचे, एकमेकांचा स्पर्श पाप मानले जायचे, इतर जातीतील लोकांनी ब्राम्हणां समोर उभे राहणे धर्मद्रोह माणला जायचा, ब्राम्हणाबद्दल बोलणे पाप माणले जायचे. एवढे जाचक बंधने घालून दिलेले असल्यामुळे फक्त ब्राम्हणच शिक्षण, नोकरी या क्षेत्रात समोर होते. आणि इतरांना जात बघून शिक्षण व नोकरी नाकारून विषमतेची वागणूक दिली जायची. लोकांमध्ये बंधुभाव निर्माण होऊन, जातीभेद नष्टव्हावा,समतेची पेरणी होऊन प्रत्येक जाती धर्मातील लोकांना संधी मिळून त्यांना सामाजिक प्रतिनिधित्व मिळावे, कोणत्याही जातीला जातीचा म्हणून कोणतीही नाकारली जाऊ नाही म्हणून आरक्षणाची सुरवात राजर्षी शाहु महाराज यांनी केली. राजर्षी शाहु महाराज यांनी आरक्षण देताना गरिबी श्रीमंती याचा विचार केला नव्हता तर कोणा कोणाला जातीच्या आधारावर समोर येऊ दिले जात नाही, कोणाकोणाला सोबत विषमता पाळुन सामाजिक मागास बनवले गेले अशा लोकांना सामाजिक प्रगत बनवण्यासाठी राजर्षी शाहु महाराज यांनी आरक्षण सुरू केले. आरक्षण गरीबी हटवण्यासाठी नाही तर सामाजिक प्रतिनिधित्व बहाल करून विषमता नष्ट करण्यासाठी निर्माण केले गेले आहे हे तरी समजून घेणे आवश्यक आहे. जेथे माणसाचा माणसाला स्पर्श करणे, सार्वजनिक ठिकाणचे पाणी पिणे, गावातून ऐटीत चालने, चांगले कपडे घालने हे लोकांना पचत नव्हते. याला काही लोक विरोध करत होते अशा लोकांना मानसन्मान निर्माण करून जातीभेद पाळणाऱ्या लोकांच्या सोबत बसवून विषमता दुर करण्याची क्रांती म्हणजे आरक्षण होय. दुरदृष्टी असलेल्या व सामाजिक समता प्रस्थापित होण्यासाठी दिलेल्या आरक्षणाचा आज चुकीच्या पद्धतीने अर्थ काढला जातो हि शोकांतिका आहे. भारत हे जनकल्याणकारी राष्ट्र आहे म्हणून प्रत्येक जनतेच्या हिताचे कार्य सरकार ला करावे लागते. जागृत नागरिक असतील तर सरकार नागरिकांच्या हिताचे काम करत असते. परंतु नागरिक जागृत नसतील तर नागरिकांना भुलवुन त्यांच्या टाळुवरचे लोणी खाल्ले जाते आणि जनतेच्या समस्या वाढवल्या जातात. तरीही जन कल्याणकारी राष्ट्र असल्याने सरकार ला जनकल्याणासाठी योजना राबवाव्या लागतात. आज बरेच लोक म्हणतात आम्हाला आरक्षण नाही म्हणून आम्ही शिक्षण शिक्षण घेऊ शकत नाही, आरक्षण नाही म्हणून नोकरी मिळू शकत नाहीत. आरक्षण नाही म्हणून आम्ही गरीबच राहलो. आरक्षणाचा संबंध गरीबीशी जोडणे हे अज्ञान आहे. देशात गरीबांची संख्या कमी नाही हे मान्यच आहे. पण गरिबी निर्मुलनासाठी सरकारने अनेक योजना तयार करून गरिबी दुर करण्याचे प्रयत्न केले जातात. आरक्षण गरिबी हटाव चा कार्यक्रम नसुन प्रतिनिधित्व बहाल करते हे लक्षात घेणे आवश्यक आहे. जसे गरिबांना सरकारने ने अन्न सुरक्षा योजना अंतर्गत अत्यंत कमी दरात शासकीय दुकानात अन्न उपलब्ध करून दिले आहे. गरीब बेरोजगार लोकांसाठी हाताला काम मिळून पगाराची हमी निर्माण करून देण्यासाठी रोजगार हमी योजना सुरू केली आहे. गरीबांच्या मुलांना शिक्षणाला मदत व्हावी म्हणून अनेक शिष्यवृत्ती सरकार देत असते. नँशनल मीन्स कम मिरीट स्कॉलरशिप दरवर्षी एक लाख गरीब विद्यार्थ्यांना सरकार कडून दिली जाते. प्रधानमंत्री शिष्यवृत्ती योजने अंतर्गत दरमहा गरीब विद्यार्थी मुलांना अडीच हजार रुपये तर मुलींना तिन हजार रुपये मिळतात. अजून प्रधानमंत्री यशस्वी योजना अंतर्गत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दरहा महा देऊन शैक्षणिक आर्थिक सहकार्य केले जाते, महाराष्ट्र एकलव्य शिष्यवृत्ती देखील आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून सुरू करण्यात आली आहे. यासोबतच देशात वा विदेशात आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना संशोधन करण्यासाठी सरकार कडून वार्षिक लाखों रुपयांचे सहकार्य सारथी शिष्यवृत्ती अंतर्गत केले जाते. राहीला प्रश्न नोकरी चा तर आरक्षणाच्या माध्यमातून केवळ पन्नास टक्के जागा भरल्या जातात. उर्वरीत पन्नास टक्के तर खुल्या गटासाठी असतात. थोडक्यात काय तर गरीबी हटवण्यासाठी सरकार वेगवेगळ्या योजना करत असते ते सरकारचे कर्तव्य आहे. गरीब आहे म्हणून आरक्षण मिळावे हे अज्ञान आहे. आरक्षण मिळण्यासाठी तो सामाजिक व शैक्षणिक दृष्टीने मागास पाहिजे. अजूनही सोप्या भाषेत सांगायचे तर जात पाहून त्याला काही गोष्टी नाकारल्या गेल्या, जात पाहून अन्याय अत्याचार होत असतील, जात पाहून त्याचे नैसर्गिक हक्क अधिकार नाकारले जातील तरच अशा समुहाला आरक्षणाची तरतूद आहे. मराठा शब्द जाती वाचक नाही, वर्णव्यवस्थे नुसार कुणबी हे मागास आहेतच. म्हणून त्यांना आरक्षण देणे योग्यच आहे. परंतु जर गरिब आहोत म्हणून द्या हि मागणी मान्य होणार नाही. गरिब असणे आणि मागास असणे यात खुप फरक आहे. मागास लोकांना सामाजिक प्रगत करण्यासाठी आरक्षण आहे. गरीब लोकांची गरीबी दूर करण्यासाठी अनेक योजना असतात. म्हणून आरक्षणाचा संबंध गरिबीशी जोडणे हे अज्ञानच म्हणावे लागेल. हे बऱ्याच लोकांना पटणार नाही आणि पचणारही नाही. कारण सत्य पचवण्यासाठी खुप मोठे मन आवश्यक असते. प्रत्येक विधानसभा मतदारसंघात एक आमदार व लोकसभा मतदार संघात एक खासदार असतो. यांना दरवर्षी करोडो रूपयांचे निधी मिळत असतात ते निधी यांना ग्रामविकास, जलसंधारण, आरोग्य, शिक्षण यावर खर्च करावे लागतात. म्हणजे आमदारांनी व खासदारांनी आपल्या निधीचा वापर आपल्या मतदारसंघात केला तर दरवर्षी करोडो रुपयाची उलाढाल होऊन मतदारसंघात आर्थिक बळकटी निर्माण होईल आणि गरिबी दुर व्हायला सुरवात होईल. म्हणून नागरिकांनी राजकीय षडयंत्रात न फसता जागृत होऊन जनतेच्या हक्काचे मिळवून घेण्यासाठी एकत्रित येऊन लढा देणे आवश्यक आहे. हे सर्व योग्य रितीने करायचे असेल तर मुळ मुद्यावरून दुर्लक्ष करून चालणार तर नाही पण ईव्हीएम ला विरोध करून बँलेट पेपरवर निवडणूक घेण्याचा आग्रह केला तर जनतेचे प्रश्न सुटायला सुरवात होईल.

विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००

# थंड खावंसं वाटणं हे पित्तप्रकोपाचं लक्षण आहे का?

पित्तप्रकोपामध्ये दिसणारे महत्त्वाचे लक्षण म्हणजे शीतेच्छा! शीतेच्छा म्हणजे शीत इच्छा, अर्थात शीतसेवनाची (शीत आहाराची व शीत विहाराची) इच्छा. पित्तप्रकोपामध्ये दिसणारे महत्त्वाचे लक्षण म्हणजे शीतेच्छा! शीतेच्छा म्हणजे शीत इच्छा, अर्थात शीतसेवनाची (शीत आहाराची व शीत विहाराची) इच्छा. शीत आहार म्हणजे शरीरामध्ये थंडावा वाढवणार्या आहाराच्या सेवनाची इच्छा. जसे-दूध, तूप, लोणी, नारळाचे पाणी, गुलाबजल, वाळा, सब्जा, केळे, पेरु, सीताफळ, कलिंगड, वगैरे; तर शीत विहार म्हणजे थंड जमिनीवर झोपावेसे वाटणे, थंड वाऱ्याची झुळूक हवीशी वाटणे, थंड पाण्यामध्ये पाय बुडवून ठेवावेसे वाटणे, अंगावर चंदन-गुलाब-वाळा-मेंदी,वगैरेचा लेप लावावासा वाटणे, ऊबदार कपडे टाळून हलके-सुती कपडे घालावेसे वाटणे, दिवसभरातली गारव्याची वेळ (सकाळ व संध्याकाळ) आवडणे, वर्षातले हिवाळा व पावसाळा हे शीत ऋतु हवेसे वाटणे, वगैरे. अशी ही शीत आहाराची व शीत विहाराची इच्छा तुम्हाला होत असेल तर तुमच्या शरीरामध्ये पित्तप्रकोप (पित्तदोषाची वाढ) होत असल्याचे किंवा झाल्याचे निदान करता येते. हातापायांची, विशेषतः तळहात-तळपायांची-डोळ्यांची आग होणे, डोक्यामध्ये आग होणे किंवा सर्वांगाची आग होणे, डोळे लाल होणे, वारंवार तोंड येणे,गुदमार्गावाटे रक्त जाणे या व अशा अन्य तक्रारी सरळसरळ पित्तप्रकोप दर्शवतात व अशा व्यक्तींना होणारी शीतेच्छा स्पष्टपणे लक्षात येते. मात्र काही वेळा रुग्णामध्ये अन्य कोणताही त्रास नसतो, अर्थात ज्याला ठोसपणे पित्तप्रकोपजन्य आजार म्हणता येईल असा कोणताही त्रास तर




दिसत नसतो, मात्र वर सांगितलेले 'शीतेच्छा' हे लक्षण प्रकर्षाने दिसते.ज्यावरुन त्याच्या शरीरामधील पित्तप्रकोपाचे निदान करता येते.
विशेष म्हणजे या तक्रारी आधुनिक वैद्यकशास्त्र व संबंधित डॉक्टरांच्या तुलनेने नगण्य असतात. शिवाय या तक्रारी सांगणा र्या रुग्णांमध्ये सर्व तपासण्या नॉर्मल येतात. आधुनिक वैद्यकाचे दृष्टीने रुग्णाच्या त्रासापेक्षा तपासण्यांना अधिक महत्त्व असल्याने या तक्रारीमागचे मूळ शोधण्याचा विचारही केला जात नाही. प्रत्यक्षात हे रुग्ण आभ्यन्तर पित्तप्रकोपाने त्रस्त असतात. ही लक्षणे शरद ऋतुमधल्या उन्हाळ्यामध्ये वाढलेली दिसतात.कारण हा जात्याच पित्तप्रकोपाचा अर्थात शरीरामध्ये पित्त वाढण्याचा काळ आहे. या सर्व पित्तप्रकोपजन्य विकृतींना आयुर्वेदीय पित्तशामक उपचाराने चांगला आराम मिळालेला दिसतो.

# पोषक सुपांची गोष्ट

आपण आपल्या आहारामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या सूप्सचे प्रमाण वाढवणे खरंच आवश्यक आहे का ? दिवाळीची चाहूल लागली तसेच आणखी एका गोष्टीची चाहूल लागते ती म्हणजे हिवाळ्याची आणि याच हिवाळ्याच्या दरम्यान आपल्या घरामध्ये सूप किंवा भाज्यांचे सूप खाणाऱ्यांची-पिणाऱ्यांची संख्या वाढू लागते. आपण आपल्या आहारामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या सूप्सचे प्रमाण वाढवणे खरंच आवश्यक आहे का ? सूप प्यायल्यामुळे फायदे होतात का ?याबद्दल आजच्या लेखात थोडेसे. कोणत्याही भाज्यांचा अर्क काढणं म्हटलं की त्यातला थोडासा त्यातल्या पाच ते दहा टक्के जीवनसत्व आणि पोषणमूल्य प्रमाण कमी होतं. तुम्ही दिवसातून किमान एकदा तुमच्या आहारात समाविष्ट केलेत तर यातून होणारे फायदे अनेक आहेत एक तर सूप हे पचायला अत्यंत हलकं असतं, दुसरं म्हणजे त्यातील मिठाचं प्रमाण अतिशय कमी असतं तिसरं म्हणजे तुमच्या शरीराला योग्य प्रमाणात आर्द्रता देऊन योग्य प्रमाणात जीवनसत्वे देण्याची कला. तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे भाज्यातील तंतुमय पदार्थ तुमच्या शरीराला मुबलक प्रमाणात पोहोचवण्याचं काम सुप करू शकते एका वेळेला योग्य प्रमाणात भूक भागवणे आणि पोटाचे विकार असल्यास ते कमी करून किंवा पोटाला कोणताही त्रास न होता पचण्यास हलके म्हणून सुख हे अत्यंत महत्त्वाचे महत्त्वाचे आहे. सूप या शब्दाचा संस्कृत अपभ्रंश सु म्हणजेच सकस आणि प म्हणजेच पोषक आहे. त्यामुळे सूप तुमच्या आहारात असणं सकस आणि पोषक आहे. त्यातील भाज्यांचे प्रमाण त्याची घनता याकडे लक्ष देणं आवश्यक आहे. कोणत्याही फळभाजीचे सूप बनवताना ती कडू तर झालेली नाही ना याकडे लक्ष देणं आवश्यक आहे .कोणतीही भाजी कुकरला शिजवून घेऊ त्यानंतर तसेच सूप तयार करताना त्याला खूप वेळ ब्लेंड करू नये किंवा खूप वेळ ग्राइंड करून किंवा खूप वेळ मिक्सरमध्ये फिरवू नये त्यातून त्याच्या सगळ्या पोषक तत्वांचा ऱ्हास होतो. हिवाळा जवळ आलेला असताना दुधीचं सूप, भोपळ्याचं सूप, फ्लॉवरचे सूप, कोबी सूप यांसारखे सूप तुमच्या आहारात नियमितपणे समाविष्ट केल्यास तुमची भूक तर भागतेच आणि तुम्हाला भुकेचा नेमका अंदाज यायला देखील मदत होते. ज्यांना काही भाज्या आवडत नाहीत त्यांच्यासाठी मिश्र भाज्यांचे सूप हा अतिशय उपयुक्त प्रकार आहे.




रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी पचनासाठी हलकं होण्यासाठी लहानांपासून ते थोरांपर्यंत सूप हा अत्यंत उपयुक्त पदार्थ आहे. ज्यांना श्वसनाचे विकार आहेत किंवा दातांचे विकार आहेत त्यांच्यासाठी सूप अत्यंत उपयुक्त आहे. फॉस्फरस, पोटॅशियम यांसारख्या खनिजांची भरपूर असणारे सूप रक्त दाब, दमा असणाऱ्यांवर साठी औषधासमान आहे.तोंडाला चव नसणे, भूक मंदावणे अशा विकारांवर सूप उपायकारक आहे. विशेषतः मांसाहार करणार्यांसाठी चिकन सूप , पाया सूप अत्यंत गुणकारक आहे.हाडांची घनता वाढवणे. भुकेच्या संप्रेरकांचा योग्य समतोल साधून भूक मंदावली असेल तर त्याला उत्तम प्रेरणा देणं.झोपेचे नियोजन करणे, शरीराची झीज भरून काढणे यासारख्या गोष्टी करण्यासाठी भाज्या किंवा फळांची सूप अत्यंत उपयुक्त असते.कोणतेही सूप तयार करताना प्रथम भाजी स्वच्छ धुऊन घेणे आणि त्यानंतर ती थोडावेळ चिरून ठेवणे किंवा त्याला हलके मिठाच्या पाण्यात ठेवणे हे फार महत्त्वाचे असते. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे सूप खूप जास्त वेळ मिक्सरला ग्राइंड न करणे. सूप मंद आचेवर करावे आणि खूप जास्त आज ठेवून सूप शिजवू नये. शक्यतो सूप तयार करताना त्यावर झाकण ठेवणे अतिशय आवश्यक असते. फळभाज्यांचे सूप केल्यास त्यामध्ये जास्तीत जास्त पोषण तत्त्वांचे प्रमाण राहते. पालेभाज्यांचे सूप करताना त्याच्यामध्ये विविध फळभाज्या एकत्र करून तसेच सूप करावे तर ते जास्तीत जास्त उपयुक्त होते. मटार कडधान्य किंवा बेसन यासारख्या पिष्टमय पदार्थांचा थोडासा वापर सूप तयार करताना नक्की करावा. या हिवाळ्यामध्ये कंदमुळांचे प्रमाण बाजारात भरपूर असते त्यामुळे जर तुम्ही सूप तयार करत असाल तर त्याच्यामध्ये थोडसं कंदमुळे किसून टाकल्यास तुमच्या सुपाला उत्तम घनता येऊ शकते आणि ते पचायला देखील आणखी हलके होऊ शकते.

# झटपट वजन कमी करण्यासाठी ग्रीन कॉफी खरंच फायदेशीर? एक्सपर्टनी दिलं उत्तर

वजन कमी करण्यासाठी अनेक लोकं तासनतास व्यायाम करतात. पण का लठ्ठपणावर मात करण्यासाठी ग्रीन कॉफी फायदेशीर ठरु शकते..? जाणून घ्या डॉक्टर काय सांगतात वाढलेल्या वजनाने अनेक लोक त्रासलेले आहेत. लठ्ठपणा हे अनेक आजारांचे कारण आहे. शरीराचे वजन वाढणे एकूणच आरोग्यासाठी घातक आहे. निरोगी राहण्यासाठी आपली जीवनशैली चांगली असली पाहिजे. चुकीच्या जीवनशैलीमुळे लठ्ठपणाची समस्या निर्माण होते, यामुळे अनेक आजारांना आमंत्रण मिळते. लठ्ठपणामुळे मधुमेह, उच्च रक्तदाब, ब्रेन स्ट्रोकसह इतरही अनेक समस्या होऊ शकतात.
वजन कमी करणे ही आजच्या काळात गरज बनली आहे. कारण वाढलेल्या वजनामुळे अनेक आजार होऊ लागतात. वजन कमी करण्यासाठी अनेक लोकं तासनतास व्यायाम करतात, तर काही लोकं लठ्ठपणावर मात करण्यासाठी डाएटिंग करायला लागतात. अशा प्रकारचे अनेक उपाय करतात, परंतु वजन कमी होत नाही. अपोलो हॉस्पिटल्सच्या मुख्य पोषणतज्ज्ञ डॉ. प्रियंका रोहतगी यांनी वाढते वजन कमी करण्यासाठी इंडियन एक्स्प्रेसला एका सुपरफूडबद्दल माहिती दिली आहे. चला तर जाणून घेऊया डॉक्टर काय सांगतात. डॉक्टर सांगतात, ग्रीन कॉफी अलीकडे सुपरफूड म्हणून लोकप्रिय झाली आहे. हिरव्या रंगाच्या कॉफी बीन्स पूर्णपणे न भाजता बनवलेल्या कॉफीला ग्रीन कॉफी म्हणतात. हिरव्या रंगाच्या कॉफीच्या बियांपासून तयार करण्यात येणारी ग्रीन कॉफी पिणे हे आरोग्यासाठीही फायदेशीर ठरू शकते. ग्रीन कॉफीमध्ये अँटीओबेसिटी फॅक्टर असते, ज्यामुळे ती वजन कमी करण्यास मदत करू शकते. ग्रीन कॉफी पोषक तत्त्वांचा खजिना असल्याचे म्हटले जाते.डॉक्टर म्हणतात की, अनेक अभ्यासातून असे आढळले आहे की, ग्रीन कॉफी बीन्सचे सेवन वजन कमी करण्यासदेखील मदत करते. ग्रीन कॉफी बीन्समध्ये भरपूर अँटीऑक्सिडेंट घटक असतात, जे शरीराला अनेक आजारांपासून वाचवू शकतात. या कॉफीच्या बीन्स नैसर्गिक डिटॉक्सिफायर म्हणून काम करतात. ते शरीरातून टॉक्सिन, अतिरिक्त चरबी आणि कोलेस्ट्रॉल काढून टाकण्यास मदत करू शकतात. रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठीही ही कॉफी फायदेशीर ठरू



शकते, असे त्यांचे म्हणणे आहे.डॉ. रोहतगी यांनी नमूद केले की, लठ्ठपणासाठी हा काही चमत्कारिक उपाय नाही. त्याचे परिणाम व्यक्तींमध्ये वेगवेगळेही असू शकतात. खरंतर निरोगी राहण्यासाठी संतुलित आहार आणि नियमित व्यायामही करणे आवश्यक आहे. ग्रीन टीमध्ये कॅलरीजचे प्रमाण खूप कमी असते. ग्रीन कॉफी बिन्समध्ये आवश्यक पोषक आणि अँटिऑक्सिडंट्स भरपूर असतात. या कॉफीच्या नियमित सेवनाने मेटॅबॉलिझम गतिमान होते, त्यामुळे वजन कमी करण्यास मदत होऊ शकते. कारण यामधील क्लोरोजेनिक सिड हे चरबी बर्न करण्यास मदत करते.आरोग्याच्या दृष्टीने ग्रीन कॉफी पिण्याचे अनेक फायदे आहेत. कॉफीमध्ये व्हिटॅमिन बी, फोलेट, मॅग्नेशियम आणि फ्लेव्होनॉइड्स असतात, जे कोलेस्ट्रॉल कमी करणे, हृदयाचे कार्य सुधारणे यासाठीही मदतशीर ठरू शकते. वजन झपाट्याने कमी करायचे असेल तर ग्रीन कॉफी हा एक चांगला पर्याय ठरू शकतो. पण, तुमच्या आहारात ग्रीन कॉफीचा समावेश करण्यापूर्वी तुम्ही तुमच्या डॉक्टरांचा सल्ला नक्की घ्या, असेही त्या सांगतात.

# ओबीसी आरक्षणासाठी लातुरात शिवा संघटनेच्या नेतृत्वात हिंदू लिंगायतांचा प्रचंड धडक मोर्चा धडकला जिल्हाधिकारी कार्यालयावर





लातूर : हिंदू लिंगायत समाजातील ३२ पोटजातींना ओबीसी, एसबीसी व एनटी आरक्षण मिळावे या प्रमुख मागणीसह इतर मागण्यांसाठी अखिल भारतीय वीरशैव लिंगायत शिवा संघटनेच्यावतीने संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे यांच्या नेतृत्वात व प्रांतसदस्य दत्ताभाऊ खंकरे यांच्या संयोजनात आज ३० ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता लातूर येथील गंजगोलाईजवळील महादेव मंदिरापासून ते जुने जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत प्रचंड धडक मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात जिल्हाभरातून हजारो लिंगायत बांधव सहभागी झाले होते. हिंदू लिंगायतांना आरक्षण देण्याबाबत घोषणा देत हा मोर्चा जुने जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला . मोर्चाच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी यांना मागण्यांचे निवेदन सादर केले.

हिंदू लिंगायत समाजातील ३२ पोटजातींना ओबीसी, एसबीसी व एनटी आरक्षण मिळावे, राष्ट्रसंत शिवलिंग शिवाचार्य महाराज यांची संजिवन समाधी असलेल्या श्री क्षेत्र भक्तीस्थळ अहमदपूर येथे विकासासाठी २५ कोटींचा निधी तसेच श्री क्षेत्र कपिलधार मुख्य रस्त्याचा विकास करावा, मंगळवेढा येथे महात्मा बसेवश्वर यांचे राष्ट्रीय स्मारकाचे ६५ एकर जमिनीवर त्वरीत काम सुरु करावे या इतर मागण्यांसाठी आज शिवा अखिल भारतीय वीरशैव लिंगायत युवक संघटनेच्यावतीने प्रचंड मोर्चा काढण्यात आला. सरकारने लिंगायत समाजाच्या मागण्यांची तातडीने दखल घेवून मागण्या मान्य कराव्यात, सरकार लिंगायतांना ओबीसी आरक्षण देवून इतरही मागण्या मान्य करील अशी आम्हाला आशा आहे, असे विचार प्रा. मनोहर धोंडे यांनी मोर्चासमोर भाषण करताना मांडले. तसेच हिंदु लिंगायत समाजाच्या मागण्या मान्य होईपर्यंत शिवा वीरशैव संघटना लढा लढत राहिल. सरकारने मागण्या मान्य न केल्यास लढा तीव्र करू असा इशारा शिवा संघटनेचे प्रांत सदस्य दत्ताभाऊ खंकरे यांनी आपल्या भाषणातून दिला.

या प्रचंड धडक मोर्चात शिवा संघटनेचे प्रांत सदस्य दत्ता खंकरे, उमाकांतप्पा शेटे, आचार्य गुरुराज स्वामी, माजी आ. शिवशरण बिराजदार, प्रेरणाताई होनराव, भक्ती स्थळ ट्रस्टचे अध्यक्ष भगवंतराव चांभरगेकर, चंद्रकांत वैजापुरे, बसवराज पाटील कौळखेडकर, सुभाषअप्पा मुक्ता, उदगीर बाजार समितीचे सभापती सिध्देश्वर पाटील, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष अण्णासाहेब पाटील, शिवानंद हेंगणे, ओम पुणे, विठ्ठल ताकबिडे, वैजनाथ तोनसुरे, संजय कोठाळे, सातलिंग स्वामी, लक्ष्मण विभुते, कल्पना बावगे, भीमाशंकर लखादिवे, पद्मीनबाई खराडे, विलास खिंडे, अंतेश्वर तोडकरी आदी सहभागी झाले होते.

# उत्तम तरकसे, गोल्डन हुमानिटी पुरस्कार २०२३ ने सन्मानित




वाशी नवी मुंबई :- येथील विष्णुदास भावे नाट्यगृह येथे हॅपी मिरर फाउंडेशनच्या वतीने आयोजित कार्यक्रमात मा.श्री उत्तम दा. तरकसे आसरढोहकर (जेष्ठ साहित्यिक, विचारवंत तथा महाराष्ट्र पोलीस गुन्हे शाखा नवी मुंबई स्थित कार्यरत) यांना त्यांच्या साहित्याकरिता *गोल्डन हुमानिटी पुरस्कार २०२३ या विशेष पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले, कार्यक्रमास केंद्रीय मंत्री मा* ना* रामदासजी आठवले साहेब श्रीमती. सिमरन आहुजा (अभिनेत्री) मा. शेख रमजान (हॅपी मिरर फाउंडेशन संस्थापक/ अध्यक्ष) मा. सुरेश यादव मा. चंद्रशेखर दुधाळ इत्यादी उपस्थित मान्यवर श्री. उत्तम दा तरकसे यांना रामदास आठवले यांच्या हस्ते सदरचा पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले तसेच सदर फाउंडेशनने अनेक इतर कलावंतांना सुद्धा वेगवेगळ्या पुरस्काराने वेगवेगळ्या कले करिता सन्मानित करण्यात आले .

सदरच्या कार्यक्रमास बहुतांशी रसिक व चाहत्या वर्गाने विष्णुदास भावे नाट्यगृह अगदी खचाखच भरले होते सदर कार्यक्रमास कु. बन्नी या विशेष बालकेने सुद्धा आवर्जून हजर होती सदर कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन खूपच सुंदर मा. शेख रमजान यांनी केले होते सदर कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने करून शेवट सर्व उपस्थितीचे आभार मानून कार्यक्रम संपला.

# बुद्ध गार्डन येथे आयोजित वर्षावास कार्यक्रमाचा समारोप

लातूर : लातूर शहरातील बुद्ध गार्डन येथे बुद्धगया महिला मंडळ यांच्या वतीने वार्षावास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते याचा समारोप २८ ऑक्टोंबरं रोजी अश्विन पौर्णिमेनिमित्त करण्यात आला. या वर्षावासाच्या काळाल बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथाचे वाचन आयुष्यमान उपासिका उषा चिकटे, नयना खंडागळे यांनी केले. त्यावर बौद्धाचार्य आयु. ज्ञानोबा इंगळे गुरुजी यांनी सोप्या शब्दात गृहस्थी जीवनात धम्माचे आचरण कसे करावें या बाबत धम्म समजावून सांगीतला. अध्यक्षपदासाठी आयु मुगळेताई यांनी नयना खडागळे याचे नाव सुचविले याला आयु. सुमनबाई कांबळे यांनी अनुमोदन दिले. आदर्शांच्या पूजे नंतर भंते धम्मसार यांनी उपासक उपाशीका यांना त्रीशरण व पंचशील दिले. धम्म प्रतिज्ञा सुमनबाई यांनी तर भीम प्रतिज्ञा मुगळे ताई, निलंगेकर ताई यांनी दिली , २२ प्रतिज्ञा ,विमल इंगळे यांनी दिल्या तर गौरव गाथा समुदाय, संविधान वाचन आयु उषा चिकटे यांनी घेतले. सूत्र संचलन व प्रास्तविक मुगळे ताई यांनी केले.भन्ते धम्मसार यांच्या मंगलवाणीने धम्मदेशना देण्यात आली या कार्यक्रमासाठी बुद्ध गया महिला मंडळानी अथक परिश्रम घेतले. हा सर्व कार्यक्रम बौद्धाचार्य इंगळे गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला शेवटी आयु उषा चिकटे यांनी उपस्थितांचे मनः पूर्वक आभार मानले व शरण तया नंतर भोजनदान देण्यात येऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



# मुख्यमंत्री पदासाठी आरक्षणाची तरतूद करावी..! प्रा. दयानंद सरवदे



रेणापूर / प्रतिनिधी :- आपल्या भारत देशामध्ये प्रस्थापित व्यावस्थेने नाकारलेल्या समूहाला प्रतिनिधीत्व देऊन समान संधी देण्यासाठी आरक्षणाची तरतूद भारतीय राज्यघटनचे शिल्पकार डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून केली. परंतू भारतीय राज्यघटनेला आणि घटनेच्या शिल्पकाराला अपेक्षीत असलेला न्याय अध्याप पर्यंत आरक्षीत समूहाला मिळाला नाही. त्यामूळे सरकारी नोकर्यातील अनुशेष कायम शिल्लक ठेवला. आरक्षणातून लोकप्रतीनिधी निवडले गेले परंतू निर्णय प्रक्रियेत त्यांना कायम दुय्यम स्थान मिळत गेले. हे येथील प्रस्थापित व्यावस्थेने केलेले जाणीवपूर्वक षडयंत्र आहे हे सत्य नाकारता येत नाही. उलट सत्तेच्या सर्वो च्च ठिकाणी सातत्याने राहणाऱ्या प्रभावशाली जात समूहाकडून आरक्षणाची मागणी होत आहे. महाराष्ट्रामध्ये मराठा समाजाचे आतापर्यंत अनेक मुख्यमंत्री झाले. बहुसंख्य आमदार याच जातीतले असतात. शेती, सहकारी क्षेत्र , खाजगी क्षेत्र, उद्योगधंदे कारखाने अशा अनेक क्षेत्रामध्ये मराठा समाजाचा दबदबा आहे. अशा सत्तेच्या केंद्रस्थानी असणाऱ्या समूहाला आरक्षण मागावे लागते हे पूर्णपणे नेतृत्व करणाऱ्या लोकांचे अपयश आहे. जर सत्तेच्या प्रमूख ठिकाणी असणार्या समाजाचा विकास होऊ शकला नाही तर कायम दुय्यम असणाऱ्या समाजाचे काय हाल असतील असा प्रश्न निर्माण झाला आहे. मराठा समाजाला लोकसंख्ये नूसार संविधानिक आरक्षण देण्यात यावे तसेच मुख्यमंत्री पदासाठीही आरक्षणाची तरतूद करुण अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती, इतर मागास प्रवर्ग आणि नवीन आरक्षणात समील होणाऱ्या मराठा समाजाला कायदेशीर संधी देण्यात यावी. स्थानिक स्वराज्य संस्थेप्रमाणे आरक्षणाची अमंलबजावणी व्हावी. सत्तेचे विकेंद्रीकरण व्हावे. तरच समतोल विकास होईल. नाही तर हे अपयशी नेतृत्व पून्हा पुन्हा सत्तेच्या प्रमुख ठिकाणी बसेल आणि प्रस्थापित धनदांडग्या घराण्याची अघोषीत हुकूमशाही अशीच चालू राहिल. अशीच परिस्थीती जवळपास देशातील सर्व राज्यात आहे. म्हणून मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीला न्याय देऊन संविधानिक मुख्यमंत्री पदासाठी आरक्षणाची तरतूद करावी. अशी मागणी देशाच्या राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्याकडे पत्राद्वारे प्रा. दयानंद चोखोबा सरवदे यांनी केली आहे.

# ध्यान मनुष्याच्या मनाला प्रशिक्षित करते - धम्मचारी विरतकुमार





अहमदपूर /प्रतिनिधी : - २९ ऑक्टोबर २३ रोजी सामाजिक न्याय विभागाच्या वतीने चालवल्या जाणाऱ्या डॉ बाबासाहेब आंबेडकर मुलांची निवासी शाळा मरशिवनी अहमदपूर येथे विद्यार्थ्यांनसाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते आज प्रत्येक मनुष्य हा मनःशांती साठी सुखाच्या शोधात आहे त्याच्या मनाला स्थिर करण्यासाठी तो भटकंती करत आहे सुखी जीवन जगण्यासाठी तो स्पर्धे च्या युगात फिरत आहे अस्वस्थ असलेल्या मनाला ध्यानातून शांत करता येवू शकते. ध्यान मनाला प्रशिक्षित करते म्हणून आपण नेहमी ध्यान केले पाहिजे ध्यान ही प्रत्यक्ष मनाची कृती आहे यावर बोलण्यापेक्षा लिहिण्यापेक्षा अनुभवाची बाब आहे ध्यान मनाचा आरसा आहे तर विद्यार्थी जीवनात ध्यान केल्यामुळे एकाग्रता प्राप्त होते त्यामुळे आपण केलेला अभ्यास लक्षात राहतो व आपण चांगल्या प्रकारे जीवन जगू शकतो असे मत धम्मचारी विरतकुमार यांनी व्यक्त केले

कार्यक्रमाच्या सुरुवातीला भगवान गौतम बुद्ध व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले धम्मचारी विरतकुमार यांचा सत्कार सर्व शिक्षक व विद्यार्थी यांच्या वतीने एस बी कांबळे यांनी केला. या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक पी आर पवार तसेच शाळेतील सर्व विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांचाही सहभाग होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दयानंद लोंढे शाळेतील विद्यार्थीनी केले. प्रास्ताविक भरत आंधळे यांनी केले तर श्रीमती जे एस देवकते यांनी सर्वांचे आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीमती के आर बनसोडे, श्रीमती ए एन गव्हाणे,डी जी जाधव ,जी जी चव्हाण व शाळेतील विद्यार्थीनी यांनी प्रयत्न केले.

# बेकायदेशीर शस्त्र बाळगल्याप्रकरणी सराईत गुन्हेगारांवर कारवाई; गावठी पिस्टल, प्राण्याची शिंगे, वाघाची नखे जप्त




वाई - बेकायदेशीर शस्त्र बाळगल्याप्रकरणी बावधन (ता. वाई) येथील पोलीस अभिलेखावरील गुन्हेगाराला अटक करून त्याच्याकडून ३ गावठी पिस्टल, २ गावठी कट्टे, ७८ जिवंत काडतुसे, ३७० वापरलेल्या काडतुसाच्या रिकाम्या पुंगळ्या, २ तलवारी, वन्यजीव प्राण्याची शिंगे, वाघाचे नख असा ६,२०,३००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल सातारा पोलिसांनी जप्त केला. सातारा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने रविवारी (ता.२९) ही धडाकेबाज कारवाई केली. अविनाश मोहन पिसाळ (रा. बावधन नाका, ता. वाई) असे अटक केलेल्या संशयिताचे नाव आहे. पोलीस अधीक्षक समीर शेख व अपर पोलीस अधीक्षक श्रीमती आँचल दलाल यांनी जिल्ह्यातीलबेकायदेशीर शस्त्र बाळगणाऱ्या इसमांच्यावर कारवाई करण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत. त्याप्रमाणे पोलीस निरीक्षक अरुण देवकर यांनी सहायक पोलीस निरीक्षक रविंद्र भोरे, पोलीस उपनिरीक्षक पतंग पाटील,अमित पाटील यांच्या अधिपत्त्याखाली एक विशेष तपास पथक तयार केले आहे.दरम्यान बावधन नाका (वाई) येथील पोलीस अभिलेखावरील आरोपी अविनाश मोहन पिसाळ याच्याकडे बेकायदेशीर देशी बनावटीचे पिस्टल आहे तसेच त्यास शिकारीचा छंद असून त्याच्याकडे वन्यजीव प्राण्यांचे अवयवही आहेत अशी माहिती पोलिस निरीक्षक श्री. देवकर यांना मिळाली. त्यांनी बातमीच्या अनुषंगाने सपोनि रविंद्र भोरे व त्यांच्या पथकास कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार या पथकाने रविवारी (ता.२९) वाई वनविभागाच्या अधिकारी स्नेहल मगर व त्यांच्या सहकाऱ्यांना सोबत घेवून मिळालेल्या बातमीचे ठिकाणी छापा टाकला.यावेळी पोलीस अभिलेखावरील अविनाश पिसाळ या गुन्हेगाराकडून ३ गावठी पिस्टल, २ गावठी कट्टे, ७८ जिवंत काडतुसे, ३७० वापरलेल्या काडतुसाच्या रिकाम्या पुंगळ्या, २ तलवारी, वन्यजीव प्राण्याची शिंगे, वाघाचे नख असा ६,२०,३००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करून त्याचे विरुध्द वाई पोलीस ठाण्यात शस्त्र अधिनियम व वन्यजीव सरंक्षण अधिनियम अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला.सदर कारवाईत स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक श्री.देवकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक सुधीर पाटील, रविंद्र भोरे, उपनिरीक्षक पतंग पाटील, विश्वास शिंगाडे, अमित पाटील, मदन फाळके, पोलीस अंमलदार अतिश घाडगे, संतोष सपकाळ, संजय शिर्के, विजय कांबळे, शरद बेबले, लक्ष्मण जगधने, लैलेश फडतरे, सचिन साळुंखे, प्रविण फडतरे, सनी आवटे, अमित माने, अविनाश चव्हाण, गणेश कापरे,अमित सपकाळ, प्रमोद सावंत, स्वप्नील कुंभार, ओमकार यादव, विक्रम पिसाळ, मोहन पवार, अरुण पाटील, विशाल पवार, प्रविण पवार, रोहित निकम, सचिन ससाणे, पृथ्वीराज जाधव, मयूर देशमुख, वैभव सावंत, संकेत निकम, शिवाजी गुरव, संभाजी साळुंखे, पंकज बेसके, अमृत कर्पे सायबर विभागाचे अमित झेंडे, अजय जाधव यांनी सहभाग घेतला. या कारवाईत सहभागी अधिकारी व अंमलदार यांचे पोलीस अधीक्षक समीर शेख, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती आँचल दलाल यांनी अभिनंदन केले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE